आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ जुलै २०११ | वर्ष २८ | अंक ७

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १०




आपण स्वतःला निर्वाचित कधी करणार?
इंधन दरवाढीच्या विषयी खरी गरज पर्यायावर विचार करण्याची आणि स्वतःला निर्वाचित करण्याची आहे. - शरद जोशी १६



मुक्तिपथ कहाँ है?
हम आज मुक्ति की ओर अग्रगामी नहीं बल्कि नये नये किस्म की गुलामियों की ओर अग्रेसर है। - अॅड. दिनेश शर्मा २५


## भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे सेनापती अण्णा हजारे यांना सवाल

# रेशन व्यवस्थेत प्रतिवर्षी ४० हजार कोटींचा भ्रष्टाचार

## तरीही भ्रष्टाचाराला संधी न देणाऱ्या पर्यायाला विरोध का?





प्रत्येक वर्षी सार्वजनिक वितरण व्यवस्था चालू ठेवण्यासाठी ७० हजार कोटी रुपये अन्न अनुदान म्हणून सरकार खर्च करते; पण वाटप झालेल्या धान्यापैकी फक्त ४१ टक्के धान्य जनतेपर्यंत पोचते. याचा अर्थ अनुदानातील ४२ हजार कोटी रुपये रक्कम केवळ भ्रष्टाचार, गैरव्यवहार इत्यादींवर खर्च होत आहे. हा भ्रष्टाचार प्रतिवर्षी चालणारा आहे. अण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हा भ्रष्टाचार दूर व्हावा असे वाटत नाही काय?

- अजित नरदे

शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ६ । ६ जुलै २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठरचना/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको–औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

■ जागरण
**रेशन व्यवस्थेत प्रतिवर्षी ४० हजार कोटींचा भ्रष्टाचार**
अजित नरदे ........ ३

■ आजकाल
**आंदोलन जोशात सर्वसामान्य कशात?**
ज्ञानेश्वर शेलार ........ ७

■ स्वातंत्र्य
**जावे शेतकऱ्याच्या वंशा**
विनय हर्डीकर ........ १०

■ मधोमध
**आपण स्वत:ला नियंत्रित कधी करणार?**
दत्ता जोशी ........ १६

■ कॉमन नॉन सेन्स
**भाजपची दिवाळी की दिवाळे?**
सुधाकर जाधव ........ १९

■ वाङ्मय शेती
**आता गरज पाचव्या स्तंभाची**
गंगाधर मुटे ........ २२

■ भारत की जुबानी
**मुक्तीपथ कहाँ है?**
ॲड. दिनेश शर्मा ........ २५

■ विशेष
**गुलामगिरी**
ॲड. सुभाष खंडागळे ........ २८

■ (उ)संतवाणी
**हरितक्रांती आख्यान**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ ३०

■ **शेतकरी संघटना वृत्त** ........ ३२

# ना पाऊस ना पेरणी तरी कृषिदिनाची गाणी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस राज्यात सर्वत्र कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. जोपर्यंत शेतीविषयक आस्था असणारे मुख्यमंत्री सत्तेवर होते तोपर्यंत हा दिवस साजरा करण्यात काहीतरी उत्साह, उत्स्फुर्तपणा दिसून येत होता. आताचे मुख्यमंत्री हे फक्त शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आले आहेत, इतकंच त्यांचं शेतीचं नातं अन्यथा त्यांना शेतीबद्दल आस्था असल्याचा एकही पुरावा मिळालेला नाही. नुकताच साजरा झालेला १ जुलैचा कृषिदिनाचा कार्यक्रम म्हणजे याचा जिवंत पुरावा होय. कोकण सोडला तर सगळ्या महाराष्ट्रात पेरण्यांची परिस्थिती भयानक आहे. १५ जुलैपर्यंत पावसाने ओढ दिली, तर खरिपाचा हंगाम पूर्ण हातातून जायची भीती आहे आणि मुख्यमंत्री मात्र कृषिरत्न, कृषिभूषण पुरस्कारांची खैरात वाटण्यात मग्न आहेत. जोंधळ्याला चांदणं लखडून येण्याच्या गोष्टी करणारे ना. धों. महानोरांसारखे स्वत:ला शेतकरीपुत्र आणि शेतकरी म्हणवून घेणारे निसर्गकवीसुद्धा कृषिरत्न पुरस्कार स्वीकारण्यात गुंग आहेत. महानोरांच्या प्रदेशात इतकंच काय, महानोरांच्या गावात १०% सुद्धा पेरण्या झालेल्या नाहीत. उठता बसता शेतीचे संदर्भ देणारे आणि नुकतंच बांधावरून आल्याचा आव आणणारे ना. धों. महानोर असं का नाही म्हणाले, ''या वर्षी परिस्थिती बिकट आहे. पुरस्कार प्रदानाचा कार्यक्रम करू नका. पाऊस पडला आणि पेरण्या झाल्या, तर हाच कार्यक्रम आपण दुप्पट आनंदाने साजरा करू,'' पण तसं घडलं नाही.

कॉमनवेल्थ घोटाळासम्राट मा. सुरेश कलमाडी यांनी उभारलेल्या बालेवाडीच्या क्रीडा संकुलात तमाम शेतकरी बांधवांनी शासनाचे पुरस्कार रांगा लावून स्वीकारले. या क्रीडा संकुलाला छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव देण्यात आलं आहे. मिर्झा राजे जयसिंग यांचं आक्रमण जेव्हा स्वराज्यावर झालं त्यावेळी वेगवेगळ्या पातळ्यांवर मिर्झा राजांना टक्कर देत थोरल्या महाराजांनी प्रयत्नांची शिकस्त केली; पण जेव्हा त्यांच्या लक्षात आलं- लढा लांबत चालला आहे, पावसाळा तोंडावर आहे, मोगलांचं सैन्य स्वराज्यात नासधूस करत आहे. जर पेरणीचा हंगाम हातचा गेला, तर पुढचं सगळं वर्ष वाया जाईल. आपलं सगळं सैन्य आणि प्रजा पोट हातावर घेऊन आहे. अशा परिस्थितीत सगळ्यात पहिल्यांदा काय केलं पाहिजे- पेरण्या शांततेत पार पडतील असं काहीतरी केलं पाहिजे. सगळा अपमान गिळून थोरले महाराज केवळ शेतकऱ्याच्या हितासाठी मिर्झा राजांच्या तंबूत गेले आणि तह केला.



आजचे गादीवरचे महाराज सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या काडीचातरी विचार करणार आहेत का? आणि जर करणार नसतील, तर थोरल्या महाराजांच्या नावाच्या क्रीडा नगरीत जाऊन शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन जखमेवर मीठ चोळण्याचं काम कशासाठी करीत आहेत? एकीकडे केंद्रात जाऊन साखरेच्या निर्यातीचा कोटा थोडा वाढवा अशी याचना हे करत राहतात. प्रत्यक्षात त्यांच्याच पक्षाचं सरकार केंद्रात असताना ही याचना करायची वेळ यांच्यावर का येते? शेतकऱ्याचं दु:ख शेतकऱ्यांच्या पोटी जन्मलेल्या गादीवरच्या आजकालच्या महाराजांना बिलकुल कळेनासं झालं आहे. याला काय म्हणावं? कृषिदिनाच्या निमित्ताने एकूणच कृषि धोरणाचा आढावा घेऊन निदान राज्याच्या पातळीवर तरी, काहीतरी महत्त्वाचा निर्णय होणे आवश्यक होते. पेट्रोलची झालेली दरवाढ आणि उसाचं महाराष्ट्रातील अतिरिक्त उत्पादन यांची सांगड घालण्यासाठी उसापासून इथेनॉल निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे शासनाला शक्य होते. ही घोषणा १ जुलैच्या कृषिदिनाचे औचित्य साधून करता आली असती. पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत सहज वाढवणे शक्य होते, त्यामुळे सध्या संकटात सापडलेल्या साखर उद्योगाला थोडा तरी दिलासा मिळाला असता. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, भारताचे कृषिमंत्री, सहकार मंत्री सगळेच्या सगळे ज्या साखरेच्या प्रदेशातले आहेत. त्याच प्रदेशातल्या समस्यांकडे बघण्याची त्यांची दृष्टी किती भयानक आहे, हेच यातून सिद्ध होते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आजही साखरेला मागणी असताना आणि साखर उद्योग निर्बंधमुक्त करा असा सततचा रेटा शेतकरी संघटनांचा असताना शासन ढिम्मपणे बसून राहतं. मुख्य समस्येला हात न घालता पेरण्या न झालेल्या बिकट परिस्थितीत पुरस्कारांचे रमणे भरून समाधान मिळवतं, या कोडगेपणाला म्हणणार तरी काय?

रेशनव्यवस्थेतील घोटाळे, साखर उद्योगातील घोटाळे, सहकारी बँकांचे घोटाळे हे सगळे घोटाळे शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहेत. मग अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा एखादा निर्णय तरी जाहीर करायचा. रेशनमधलंच धान्यच नाही, तर सगळी व्यवस्थाच सडली आहे, हे आता स्पष्ट झालेलं आहे. शासनाला ही व्यवस्था काळ्या बाजाराला चालना भेटण्यासाठीच चालवायची आहे, असा आरोप करता यावा इतके स्वच्छ पुरावे आहेत. मोठमोठ्या भ्रष्टाचारांची मोठमोठी चर्चा ऐकून सर्वसामान्य शेतकरी एक साधा प्रश्न विचारत आहे, ''वर्षानुवर्षे आम्हाला लुटणारी ही व्यवस्था जी रक्कम न केलेल्या कामापोटी खाऊन टाकते, तो केवढा मोठा भ्रष्टाचार आहे.''

छोट्या छोट्या प्रश्नांवरून मोठमोठे लढे उभारण्याचा आव आणला जात आहे. माध्यमांमधून त्यांना अतिरंजित अशी प्रसिद्धी दिली आहे; पण भारतीय व्यवस्थेचा मुख्यभाग असलेला सर्वसामान्य शेतकरी मात्र या आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरू नये, याला काय म्हणाल? चोरी झाल्याच्या नंतर चोराला कसं पकडायचं याच्यावरच सगळी चर्चा चालू आहे; पण मुळात चोरीच होऊ नये म्हणून काय करायला पाहिजे यावर कोणी बोलत नाही, ज्याच्या पीकाला उणे सबसिडी देऊन सगळ्यात मोठा भ्रष्टाचार गेली ६३ वर्षे चालू आहे त्याबद्दल काय?



### भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे सेनापती अण्णा हजारे यांना सवाल

# रेशन व्यवस्थेत प्रतिवर्षी ४० हजार कोटींचा घोटाळा

### तरीही भ्रष्टाचाराला संधी न देणाऱ्या पर्यायाला विरोध का?

श्री. आण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी चळवळीमुळे विविध क्षेत्रांत पसरलेल्या भ्रष्टाचार निर्मुलनाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलक म्हणून श्री. आण्णा हजारे यांच्या कामात सातत्य आहे त्यामुळे त्यांना देशभरातून अनपेक्षीत असा मोठा पाठींबा मिळाला. त्यांच्या समर्थकांत शहरी, मध्यमवर्गीय, सुशिक्षित, श्रीमंत, तरुणांचा मोठा सहभाग होता. आण्णा हजारेंच्या आंदोलनाच्या दबावामुळे लोकपाल विधेयक तयार करण्याच्या कामाला गती मिळाली. ही एक जमेची बाजू आहे.

भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षा होत नाही. केवळ नीतिने भ्रष्टाचार दूर होत नाही. भीती हवी अशी आण्णांची भूमिका आहे. लोकपाल निर्मितीमुळे अशी 'भीती' काही प्रमाणात निर्माण करणे शक्य आहे, ते आवश्यकही आहे. या संबंधी तपशीलाबाबत अनेक मतभेद असले तरी मी आण्णांच्या सोबत मनाने आहे. आण्णांनी भ्रष्टाचारासंबंधी जनसामान्यांत असलेल्या असंतोषाला वाचा दिली आहे, हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल.

पण २० मे २०११ रोजी दिल्लीहून 'इंडियन एक्सप्रेस' या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या एका बातमीने मला अस्वस्थ केले. बातमी आण्णा हजारेंच्या राष्ट्रीय आंदोलनातील त्यांचा सर्वात विश्वासू सहकारी आणि सूत्रधार श्री. अरविंद केजरीवाल यांच्या संदर्भात आहे. या बातमीने आण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हेतूबद्दल काही प्रश्न मनात निर्माण झाले.

ती बातमी अशी होती :

दिल्ली सरकारच्या 'धान्य खरेदीसाठी रोख रक्कम' योजनेच्या अभ्यास प्रयोगाला जोरदार विरोध होत आहे. परिवर्तन या सेवाभावी संस्थेचे श्री. अरविंद केजरीवाल यांचा या प्रयोगालाच विरोध आहे. या प्रयोगात भाग घेणाऱ्या कुटुंबांना परिवर्तन संस्थेचे कार्यकर्ते धमकी देत असल्याची तक्रार 'अभ्यास प्रयोग' करणाऱ्या दुसऱ्या सेवाभावी संस्थेने केली आहे.

या अभ्यास प्रयोगात पश्चिम दिल्लीतील रघुवीर नगरमधील ५०० कुटुंब सहभागी झाले आहेत. या योजनेतून होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याचे काम 'सेवा भारती' या सेवाभावी संस्थेकडे सोपवले आहे. या कार्यक्रमासाठी 'युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (यूएनडीपी) यांनी आर्थिक मदत केली आहे.



अजित नरदे

या योजनेत सदर संस्था निवडक ५०० घरांतील स्त्रियांच्या बँक खात्यात रु. १००० जमा करीत आहे. धान्याऐवजी रोख रक्कम घेणारे आणि रेशन दुकानातूनच धान्य घेणे पसंद करणाऱ्या कुटुंबांची तुलना या अभ्यासात केली जाणार आहे.

रेशनच्या धान्याऐवजी रोख रक्कम घेणाऱ्या कुटुंबांना 'रेशन व्यवस्था सुधार अभियान'चे कार्यकर्ते धमकी देत असल्याची लेखी तक्रार सेवा भारतीने दिल्ली सरकारकडे केली आहे. 'रेशन व्यवस्था सुधार अभियान'चे नेतृत्त्व केजरीवाल यांच्या 'परिवर्तन' संस्थेकडेच आहे.

परिवर्तन संस्थेचे ३० ते ३५ कार्यकर्ते गटाने रघुवीरनगरमध्ये आले. रोख रक्कम घेणाऱ्या कुटुंबांची यादी त्यांच्याकडे होती. रोख रक्कम घेणाऱ्या १०० कुटुंबातील स्त्रियांना त्यांनी धमकी दिली. त्यांची आणि त्यांच्या रेशन कार्डांची जबरदस्तीने छायाचित्रे



**प्रत्येक वर्षी सार्वजनिक वितरण व्यवस्था चालू ठेवण्यासाठी ७० हजार कोटी रुपये अन्न अनुदान म्हणून सरकार खर्च करते; पण वाटप झालेल्या धान्यापैकी फक्त ४१ टक्के धान्य जनतेपर्यंत पोचते. याचा अर्थ अनुदानातील ४२ हजार कोटी रुपये रक्कम केवळ भ्रष्टाचार, गैरव्यवहार इत्यादींवर खर्च होत आहे. हा भ्रष्टाचार प्रतिवर्षी चालणारा आहे. आण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हा भ्रष्टाचार दूर व्हावा असे वाटत नाही काय?**

घेतली. तसेच या योजनेतून माघार घेण्यासाठी त्यांनी धमकीही दिली, अशी लेखी तक्रार सेवा भारतीचे संजय कुमार यांनी मुख्य सचिवांना केली आहे.

अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री हरुन युसुफ यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी अन्न व नागरी पुरवठा आयुक्तांना या संबंधात कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दिल्ली पोलिस आयुक्तांना या संबंधी कारवाई करण्याचे आदेशही मिळाले आहेत.

दरम्यान अरविंद केजरीवाल यांनी अभ्यासाच्या हेतूबद्दलच संशय व्यक्त केला आहे. ते म्हणातात, ''एका बाजूला सोनिया गांधीच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय सल्लागार समिती अन्न सुरक्षा कायद्याचा मसुदा करीत आहे. ज्यात प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य स्वस्त, अनुदानीत दरात मिळणार आहे. दुसऱ्या बाजूला दिल्ली सरकार रेशन दुकान बंद करून लोकांना रोख रक्कम देण्याचे नियोजन आयोगाची योजना राबवत आहे. यातील विरोधाभास स्पष्ट आहे.''

श्री. अरविंद केजरीवाल पुढे म्हणतात, ''ही नवी योजना धान्याच्या भाववाढीपासून संरक्षण देत नाही. भाववाढीबाबत असंवेदनशील आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था नसेल तर अन्नधान्यांच्या किमतींवर कोणतेही नियंत्रण राहणार नाही.''

''या योजनेत प्रत्येक तीन महिन्यांनी रोख रकमेच्या फेरविचार केला जाणार आहे. या रकमेत आवश्यकतेप्रमाणे बदल करण्याची तरतूद केली आहे. रेशन दुकानांतून वेळेवर धान्य मिळत नाही. त्यात मोठ्या प्रमाणात भेसळही होते,'' असा खुलासा सरकारच्या वतीने श्री. धरमपाल यांनी केला आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी धान्य खरेदी करणे त्याची साठवणूक करणे, देशभर वाहतूक करणे, रेशन दुकानांतून वाटप करणे यात प्रत्येक पातळीवर प्रचंड भ्रष्टाचार होतो, ही आता सर्वांना मान्य असलेली बाब आहे. रेशनकार्ड वाटपातही प्रचंड भ्रष्टाचार आहे. बोगस रेशन कार्ड शोधासाठी मोहिमा काढल्या जातात; पण प्रत्यक्षात त्याचा काहीही परिणाम होत नाही. पुन्हा बोगस रेशनकार्ड दिली जातातच. यात होणारा भ्रष्टाचार टाळणे सद्यस्थितीत अशक्य आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून रेशन दुकानांतून दिल्या जाणाऱ्या धान्यांपैकी फक्त ४१ टक्के धान्य लोकांपर्यंत पोहचते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी १ टक्के एवढी मोठी रक्कम सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर खर्च होते. जागतिक बँकेच्या अभ्यासाप्रमाणे ५९ टक्के धान्य चोरून खुल्या बाजारात विकले जाते. तर नियोजन आयोगाच्या मते ५८ टक्के धान्य खुल्या बाजारात जाते. गरिबी दूर करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांच्यावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ टक्के इतकी रक्कम खर्च होते. तरीही गरिबांना याचा अपेक्षीत फायदा मिळत नाही.

प्रत्येक वर्षी सार्वजनिक वितरण व्यवस्था चालू ठेवण्यासाठी ७० हजार कोटी रुपये अन्न अनुदान म्हणून सरकार खर्च करते; पण वाटप झालेल्या धान्यापैकी फक्त ४१ टक्के धान्य जनतेपर्यंत पोचते. याचा अर्थ अनुदानातील ४२ हजार कोटी रुपये रक्कम केवळ भ्रष्टाचार, गैरव्यवहार इत्यादींवर खर्च होत आहे. हा भ्रष्टाचार प्रतिवर्षी चालणारा आहे. आण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हा भ्रष्टाचार दूर व्हावा असे वाटत नाही काय?

कोणी भ्रष्टाचाराला कमीत कमी वाव देणारी पर्यायी व्यवस्था सुचवत असेल तर अण्णा हजारेंचे ज्येष्ठ सहकारी अरविंद केजरीवाल यांचा विरोध का? हा पर्याय किती यशस्वी होऊ शकतो याचा प्रायोगिक अभ्यास कार्यक्रमाला विरोध का? या प्रयोगात भाग घेणाऱ्या लोकांना धमकी देऊन प्रयोग होऊच न देण्याची धडपड केजरीवाल का करीत आहेत? कदाचित उत्साहाच्या भरात त्यांच्या

कार्यकर्त्यांनी चूक केली असेल तर त्यांनी याबद्दल खेद व्यक्त केला नाही. उलट त्यांचे समर्थन केले आहे. धान्याऐवजी रोख रक्कम देण्याला विरोध करणाऱ्यांच्या काही रास्त शंका असू शकतात. त्या शंकांचे अभ्यासातून निरसन झाले पाहिजे; पण असा अभ्यासच होता कामा नये. अशी त्यांची भूमिका योग्य नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील भ्रष्टाचार बंद करणे सरकारच्या आवाक्यात राहिले नाही. धान्य खरेदी, साठवणूक, वाहतूक आणि वितरण यातील प्रत्येक पातळीवर भ्रष्टाचार, गैरव्यवहार, गळती आणि नासाडी होत आहे. अलीकडेच सरकारी गोदामात सडणाऱ्या लाखो टन धान्यासंबंधी वाद झाला होता. ते धान्य सडण्यापेक्षा गरिबांना मोफत देण्याचा न्यायालयाचा सल्लाही बराच वादग्रस्त झाला होता.

छत्तीसगढ राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था खूप कार्यक्षमपणे कार्य करते असे म्हणतात; पण छत्तीसगढमधील दंतेवाडा भागातील कोंटा ब्लॉकमधील बहुतेक धान्य खुल्या बाजारात जादा दराने विकले जात असल्याचे सुप्रीम कोर्टाने केलेल्या पाहणीत आढळून आले. सुप्रीम कोर्टाने नेमलेल्या हरी मंदार यांनी केलेल्या पाहणीत या ब्लॉकमधील ६९ पैकी ४१ दुकाने एकच संस्था चालवते. तीच संस्था धान्याच्या वाहतुकीचे काम करते. गरिबांना फारसे धान्य मिळत नाही. रुपये २ किलोने प्रत्येकाला ३५ किलो विकण्याचे धान्य प्रत्यक्षात १४ रुपये किलोने खुल्या बाजारात विकले जाते. हे धान्य शेजारच्या ओरिसा व आंध्रातही विकले जाते.

जवळपास ५ लाख रेशन दुकानांतून विकणाऱ्या धान्यावर नियंत्रण ठेवणे कोणत्याही सरकारला शक्य नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्था चालविण्यासाठी आण्णा हजारे व अरविंद केजरीवाल यांना नेमले तरी ते भ्रष्टाचार थांबवू शकणार नाहीत. तरीही अशा व्यवस्थेला भ्रष्टाचार कमीत कमी होईल अशा पर्यायाच्या शोधाला केजरीवाल यांचा विरोध का आहे? फूड कूपन व्यवस्थेत दोष असतील तर प्रयोगात ते स्पष्ट होतीलच; पण त्यांना हे प्रयोगसुद्धा होऊ द्यायचे नाहीत. याचा अर्थ काय?

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांवरही मोठ्या प्रमाणात अन्याय होतो. शेतीमालाच्या खुल्या बाजारपेठेत



- अरविंद केजरीवाल अण्णांच्या आंदोलनातील सहकारी

**कोणी भ्रष्टाचाराला कमीत कमी वाव देणारी पर्यायी व्यवस्था सुचवत असेल तर अण्णा हजारेंचे ज्येष्ठ सहकारी अरविंद केजरीवाल यांचा विरोध का? हा पर्याय किती यशस्वी होऊ शकतो याचा प्रायोगिक अभ्यास कार्यक्रमाला विरोध का? या प्रयोगात भाग घेणाऱ्या लोकांना धमकी देऊन प्रयोग होऊच न देण्याची धडपड केजरीवाल का करीत आहेत?**

विकृती निर्माण होते. उत्तर भारतातील गहू महाराष्ट्रात कमी दरात ओतल्याने ज्वारीचे भाव पडतात. कमी पाण्यात, उष्ण हवामानात सहज येणारे ज्वारी व बाजरी मारली जाते. त्यामुळे महाराष्ट्रातील ज्वारी या महत्त्वाच्या पीकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट झाली. महाराष्ट्रात, उत्तर कर्नाटक, तेलांगण या राज्यातील ज्वारीचे एकरी उत्पादन वाढले तरी एकूण उत्पादनात घट होत आहे. याचे कारण शेतकऱ्यांना ज्वारी परवडत नाही हे आहे.

अन्न अनुदानाचा बोझा कमी व्हावा म्हणून सरकार शेतीमालाचे दर पाडण्यासाठी वेगवेगळी धोरणे जाहीर करते. यात लेव्ही, शेतीमालाच्या वाहतूकीवर बंधणे, प्रक्रियेवर बंधणे, निर्यात बंदी, काही वेळा जादा किंमत देऊन गरज नसताना केलेली आयात अशी धोरणे घेतली जातात. यामुळे शेतीमालाचे दर कृत्रिमपणे पाडून शेतकऱ्यांना रास्त भाव नाकारला जातो. याचे शेतीवर खूप दुष्परिणाम होतात.

गरिबांना धान्य देण्याऐवजी धान्य खरेदीसाठी कूपन किंवा रोख रक्कम दिले, तर त्यांना हव्या त्या धान्याची खरेदी करणे शक्य होईल. उदा. महाराष्ट्रात लोकांना ज्वारीची सवय आहे. बहुतेक वेळा ज्वारीच्या किमती गहू, तांदळापेक्षा कमी असतात. ज्वारी हे स्थानिक पीक असल्याने वाहतूक खर्च कमी असतो. स्थानिक भरड धान्यांना ग्राहक मिळतो. कोरडवाहू, गरीब शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळते; पण रेशनमधून ३५ किलो धान्य ३ रुपयाने मिळणार असेल तर ज्वारी,



**प्रतिवर्षी किमान ४० हजार कोटींचा भ्रष्टाचार ज्या योजनेत होतो, जे थांबवणे जवळपास अशक्य आहे अशी योजनाच चालू राहावी यात श्री. अरविंद केजरीवाल यांचे कोणते हितसंबंध आहेत? रोख रक्कम देण्याच्या योजनेसंबंधी त्यांच्या रास्त शंका असू शकतात; पण त्याचे निरसन प्रयोगातून करणे शक्य होते; पण त्यांचा प्रयोगालाच विरोध आहे. दहशतीने ते प्रयोगात अडथळे निर्माण करीत आहेत. हे कितपत योग्य आहे?**

बाजरीला कोणी वालीच राहत नाही.

लोकांच्या खाण्याच्या सवयी तेथील पर्यावरणाशी सुसंगत निर्माण होतात; पण सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून लोकांच्या सवयीशी विपरीत धान्याचा पुरवठा केल्याने लोकांच्या पर्यावरणाशी सुसंगत खाण्याच्या सवयी बदलतात किंवा वाटप केलेल्या धान्याचा दुरुपयोगही होतो. उदा. बेळगाव जिल्ह्यातील अथणी तालुक्यातील एका खेड्यात मी पाहिले- शेतकरी भात भरडून जनावरांना खाऊ घालतात, कारण लोकांना ज्वारीची सवय; पण रेशन दुकानातून ३ रु. किलो दराने खूप भात मिळतो. जे घरात खपत नाही. म्हणून शेतकरी शेतमजूर भात भरडून पशूखाद्य म्हणून वापरताहेत. काही ठिकाणी गहूही भरडून जनावरांना घातले जाते. अशा पद्धतीने धान्याचा गैरवापर होणे कितपत देशहिताचे आहे?

अन्नाऐवजी रोख रक्कम प्रयोग देशात यापूर्वीही झाले आहेत. १९९८-९९ सालात आंध्रमधील काही भागात प्रयोग झाला. यात भात व केरोसीन खरेदीसाठी कूपन देण्यात आले. यात प्रत्येक लाभधारक ग्राहकाने समक्ष हजर असण्याची अट घातली होती. समक्ष हजर राहण्याची अट असल्याने पूर्वीचे ८ लाख रेशनकार्डधारक कूपन घेण्यासाठी आले नाहीत. याचा अर्थ स्पष्ट आहे. ते सर्व बोगस लाभधारक होते. यामुळे प्रत्येक महिन्यात ९ कोटी रुपयांचे २० हजार टन भात आणि ५.६७ कोटी रुपयांचे केरोसीन घेणारे बोगस लाभधारक बंद झाले. प्रत्येक महिन्याला १५ कोटी रुपये वाचले. (संदर्भ- प्लॅनिंग कमिशन वर्किंग पेपर नं.५ मे २००२ लेखक अरविंद विरमणी आणि पी.व्ही. राजीव)

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मोठा फटका साखर उद्योगाला आणि पर्यायाने ऊस शेतकऱ्यांना बसला आहे. पूर्वी ४० टक्के साखर सरकार लेव्ही म्हणून बाजारभावापेक्षा कमी दराने घेत असे. याचा परिणाम साखर उद्योग अस्थीर होण्यात झाला. साखर उत्पादनात सातत्य राहिले नाही. कधी विक्रमी उत्पादन, तर कधी मोठी तूट. यासाठी साखर उद्योग नियंत्रणमुक्त होणे गरजेचे आहे. हे सर्वांनी मान्य केले. तरीही प्रत्यक्षात ते घडत नाही. अन्नकूपन योजनेमुळे साखर उद्योगाचेही भले होईल. ऊस उत्पादकांनाही स्थैर्य मिळेल.

थोडक्यात, सार्वजनिक वितरण व्यवस्था कोणीही सुधारू शकत नाही. ५ लाख दुकानांवर नियंत्रण ठेवणे कोणालाही शक्य नाही. धान्य खरेदी, साठवण, वाहतूक आणि वितरण यातील भ्रष्टाचार बंद करणे अशक्य आहे. प्रति वर्षी ४० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार या योजनेत होतो. प्रतिवर्षी नेमाने घडणारा हा घोटाळा स्पेक्ट्रमपेक्षा भयंकर आहे. तरीही केजरीवाल यांचा अन्नकूपनाच्या प्रयोगालाही विरोध आहे.

केजरीवाल हे अण्णा हजारेंचे सर्वांत विश्वासू सहकारी आहेत. आंदोलनाच्या यशात केजरीवाल यांचा खूप मोठा वाटा आहे. शांती व प्रशांत भूषण पिता-पुत्रांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले नंतर ''मी त्यांना ओळखत नाही; पण केजरीवाल यांच्या सांगण्यावरून त्यांचे नाव लोकायुक्त समितीसाठी सुचविले,'' असे आण्णा हजारे म्हणाले. यावरून नेतृत्त्व हजारेंचे असले तरी आंदोलनाची खरी सुत्रे अरविंद केजरीवाल यांच्याकडेच आहेत. त्यांचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा पर्याय देण्यालाच विरोध आहे.

माझा प्रश्न एवढाच आहे. प्रतिवर्षी किमान ४० हजार कोटींचा भ्रष्टाचार ज्या योजनेत होतो, जे थांबवणे जवळपास अशक्य आहे अशी योजनाच चालू राहावी यात श्री. अरविंद केजरीवाल यांचे कोणते हितसंबंध आहेत? रोख रक्कम देण्याच्या योजनेसंबंधी त्यांच्या रास्त शंका असू शकतात; पण त्याचे निरसन प्रयोगातून करणे शक्य होते; पण त्यांचा प्रयोगालाच विरोध आहे. दहशतीने ते प्रयोगात अडथळे निर्माण करीत आहेत. हे कितपत योग्य आहे?

मला वाटते, श्री. आण्णा हजारे यांनी या प्रश्नाची उत्तरे दिली पाहिजेत. अन्यथा भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे सेनापती म्हणून त्यांच्या हेतूबद्दल शंका निर्माण होईल.

**अजित नरदे**
१८-अ, श्रध्दा संकूल, दुसरा मजला,
६ वी गल्ली, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
मोबाईल : ९८२२४ ५३३१०

■■

# आंदोलन जोशात सर्वसामान्य कशात?

**भ्रष्टाचार जणू वहिवाट आहे अशी जनतेची खचलेली मानसिकता सत्ताधाऱ्यांना उन्मत्त व्हायला अधिक खतपाणी घालत आहे. त्यातूनच रामदेव बाबा उपोषणाला जाईपर्यंत त्यांच्यासाठी चार चार केंद्रीय मंत्री विमानतळापर्यंत चर्चेच्या पायघड्या घालत असताना त्याच रात्री त्यांच्यावर पोलिस कारवाई होते याचा अर्थ साम-दाम-दंड काहीही वापरू, आंदोलन मात्र चिरडून टाकू आणि ते आम्ही करू शकतो ही राजकारण्यांची भावना झालेली आहे. जनतेने यातून धडा घ्यावा असेच त्यांना सुचवायचे आहे. अण्णांच्या बाबतीत अण्णा लोकशाही कमकुवत करायला निघाले आहेत, अशी टीका केली जात आहे. पंतप्रधान, न्यायाधीश वगैरे उच्चपदस्थांवर लोकपालाचा पहारा ठेवणे योग्य नाही असे असले तरी ही वेळ का आली, याचा विचार अण्णा लोकशाही मोडीत काढायला निघाले आहेत असे म्हणणाऱ्यांनी करायला हवा.**

सध्या देशात दोन आंदोलने एक अण्णा हजारेंचे आणि दुसरे रामदेव बाबांचे गाजत आहेत. दोन्ही आंदोलने आर्थिक भ्रष्टाचाराशी संबंधित आहेत. अण्णा हजारे कायमस्वरूपी उच्चस्तरीय भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी 'लोकपाल विधेयका'चा आग्रह धरीत आहेत, तर रामदेव बाबा बऱ्याच वर्षांपासून देशातील स्वीस बँकेत साठवलेला 'काळा पैसा' परत मिळविण्यासाठी आंदोलन करीत आहेत.

स्वीस बँकेतील काळ्या पैशाची चर्चा सर्वप्रथम सुरू झाली ती इंदिरा गांधींच्या काळात. त्यावेळी हा आकडा ३०० कोटी असा सांगितला जायचा. तो आता ४ लाख कोटींपर्यंत पोहोचला आहे. विकिलिक्सने केलेल्या उल्लेखामुळे हा आकडा जगजाहीर झाला आहे. प्रत्यक्ष किती रक्कम असेल हे सध्यातरी सांगणे शक्य नाही. स्वीत्झर्लंडचा दुसरा उल्लेख राजीव गांधींच्या काळात झालेल्या 'बोफोर्स' तोफांच्या दलालीच्या संदर्भात होता. ६० कोटींची दलाली घेतल्याची चर्चा बरेच दिवस चालू होती. काँग्रेसचे सरकार पडण्याला हेही एक कारण होते. ही दलाली उघड झाली नाही; परंतु भाजप सरकारच्या काळात वारंवार स्वीत्झर्लंडशी संपर्क करून ती उघड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी स्वीत्झर्लंडवरून काही माहितीची पाकिटे येत व त्यात काय उल्लेख असेल? यामुळे सर्वांचीच उत्सुकता ताणली जात असे. अर्थात बरेच दिवस असा पाकिटांचा ओघ चालू होता. निष्पन्न काहीच झाले नाही. स्वीत्झर्लंडची बँकींग व्यवस्था ही गुप्ततेवर आधारित आहे. असे पैसे ठेवलेले खाते व नाव जाहीर न करण्याच्या बोलीवरच हे पैसे तेथे ठेवले जातात. १९९१ नंतरमात्र त्यात थोडा बदल झाला आहे व स्वित्झर्लंडही आपल्या



ज्ञानेश्वर शेलार

बँकींग व्यवसायात व आंतरराष्ट्रीय धोरणात बदल करीत आहे. आपल्याच सरकारला त्यांच्या गोपनीयतेचे कारण पुढे करून शक्य तेवढी चालढकल करायची आहे की काय? अशी दाट शंका येते. वारंवार हे पैसे परत आणणे अशक्य असल्याचे बोलले जाते. रामदेव बाबांनी जेव्हा आंदोलन केले तेव्हा व त्याअगोदरच्या प्रचारामुळे आणि नुकत्याच झालेल्या अण्णा हजारेंच्या आंदोलनामुळे देशातील जनतेला हा पैसा आता नक्कीच बाहेर येईल असे वाटू लागले आहे. या आशा आता पुन्हा धुसर झाल्या आहेत. अशा परिस्थितीत लोकांची भ्रष्टाचाराबद्दल व स्विस बँकेतील पैशांबद्दल काय मानसिकता आहे, हे कोठेही चार लोक उभे असले तर लगेच लक्षात येते. भ्रष्टाचार उघडकीस येऊ लागला तर ज्यांच्यावर हे आरोप होतात. ते लगेच आरोप करणाऱ्यांचेही पितळ उघडे करण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा भ्रष्टाचार दिसत नाही का? असे प्रश्न उपस्थित केले जातात. त्यातूनच रामदेव बाबा आणि अण्णांच्या ट्रस्टची चौकशी सुरू झाली आहे. तेरी भी चूप और मेरी चूप करण्यासाठी ही पहिली



**गुंडांच्याही लक्षात आले, की आपण फक्त पैशांसाठी सत्ताधाऱ्यांना मदत करण्यापेक्षा गुंडगिरी आणि पैसा वापरून आपणच सत्ता मिळविली तर काय वाईट? ८०च्या नंतर भाई ठाकूर, फुलनदेवी, पप्पू कलानी, साधू यादव, अरूण गवळी, हाजी मस्तान वगैरे तस्कर आणि गुंड हे उघडउघड निवडणुकीच्या राजकारणात उतरले. काही तर तुरुंगात असताना निवडून आले. त्यांच्या भागातील मतदारांसाठी व सर्वसामान्यांसाठी ते परमेश्वरी अवतारच होते. नंतरच्या काळात राजकारण्यांनीच याच्या उलट विचार केला आणि गुंडांना पैसे देऊन आपल्या पदरी पाळण्यापेक्षा आपणच गुंडगिरी केली तर काय वाईट?**

उपाययोजना असते. सर्वसामान्यांच्या भावना अशावेळी काय असतात हे पाहिले तर भ्रष्टाचार कुठे नाही? भ्रष्टाचार कोण करीत नाही? असे प्रश्न सर्वसामान्य माणसे उपस्थित करतात. आपल्याला करायला संधी नाही म्हणून आपण भ्रष्टाचाराविषयी एवढे पोटतिडकीने बोलतो. खरोखर संधी मिळाली तर आपण हे बोलू का? मग त्या राजकारणी लोकांनाच काय नाव ठेवायचे? 'जो तळे राखील तो पाणी चाखील!' भ्रष्टाचार तर थोडाफार होणारच. काम होणे महत्त्वाचे. काही लोक पैसे घेतात; पण काम करीत नाहीत. त्यापेक्षा पैसे घेऊन काम करणारे काय वाईट? पैसे घेतात, वापरतात, कामही करीत नाहीत आणि नंतर पैसे परत देऊन टाकतात हे बरोबर नाही. पैसे घ्या पण काम करा! आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाने बोंबा मारून काय होणार? अण्णा-बाबासुद्धा कमी पडले, तर आपली काय वाट लागेल? आपल्या कुठे खिशातलं चाललय? अशा प्रतिक्रिया नेहमीच ऐकायला मिळतात. कदाचित अशाच स्वरूपाची प्रतिक्रिया आपल्याही मनात असेल. भ्रष्टाचाराची कीड समूळ नष्ट झाली पाहिजे असे सर्वसामान्य माणसाला वाटणे आवश्यक आहे. बहुधा ही आता वहिवाट झाली आहे, अशा भावनेतूनच आपण बोलत असतो. आंदोलनाच्या अगोदर अण्णा आणि बाबांना जो पाठींबा होता आणि भ्रष्टाचाराबद्दल पोटतिडीक होती ती अगदी थोड्याच दिवसांत मावळून गेली आहे. लोकपाल बिल आणि स्वीस बँकेतील पैसा हे विषय बाजूला पडून आता लोक आता, ''त्यांनी केलेले आंदोलन कसे चूक होते, आता त्यांनी पुढे काय करू नये, बाबांनी योगाच्या कार्यक्रमाला परवानगी घेतली आणि भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सुरू केले हे बरोबर नाही. धार्मिक लोकांनी, गुरुंनी अशा गोष्टींत खरेतर पडूच नये. त्यांचा प्रांत वेगळा आहे. अण्णा हजारे ऊठसूट उपोषण करतात किंवा उपोषणाची धमकी देतात हे योग्य नाही. बाबांनी फक्त योग शिकवावा, राजकारण करू नये! राजकारणी फार धूर्त असतात. अण्णा-बाबांना केव्हाच गुंडाळून ठेवतील. बाबांनी त्यांची संपत्ती कशी जमा केली? योगगुरूला एवढ्या संपत्तीची काय गरज.'' अशा प्रतिक्रिया देऊ लागले आहेत. आपलीही प्रतिक्रिया अशी किंवा अशाच स्वरूपाची आहे काय? अण्णांचे दिल्लीला येणेजाणे कुणाच्या पैशांवर चालते, अशी ठाकरी प्रतिक्रियाही लोकांना आवडू लागली आहे. यातून लोकांना खरोखरच भ्रष्टाचाराविषयी चीड आहे का? असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

भ्रष्टाचार, गुंडगिरी आणि राजकारण यावर माजी राष्ट्रपती आर. व्यंकटरमण यांनी आपल्या 'माय प्रेसिडेन्शिअल इअर्स' या पुस्तकात फार चांगले विवेचन केले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिली दहा-पंधरा वर्षांत स्वातंत्र्यासाठी ज्यांनी लढा दिला, अशा वलायांकीत समाजसेवी, निस्पृहः लोकांनीच सत्ता चालविली. नंतरची पिढी सत्ता टिकवून ठेवण्यासाठी निवडणुकांमध्ये पैशांचा वापर करू लागली. प्रचार, मतदारांना प्रलोभने असे प्रकार सुरू झाले. विरोधी पक्ष प्रबळ नसला तरी एकाच पक्षातील गटातटांच्या लढाईत निवडणुकांमध्ये पैशांचे महत्त्व प्रचंड वाढले. निवडणुकीत खर्च झालेला पैसा भ्रष्टाचाराच्या मार्गाने परत मिळविणे एवढेच आता शिल्लक होते. पुढच्या काही निवडणुकांमध्ये निव्वळ पैशांच्या वापराने निवडणुका जिंकणे अशक्य झाले. गुंडांना हाताशी धरावे लागले. अशी दहा-पंधरा वर्षे गेल्यानंतर गुंडांच्याही लक्षात आले, की आपण फक्त पैशांसाठी सत्ताधाऱ्यांना मदत करण्यापेक्षा गुंडगिरी आणि पैसा वापरून आपणच सत्ता मिळविली तर काय वाईट? ८०च्या नंतर भाई ठाकूर, फुलनदेवी, पप्पू कलानी, साधू यादव, अरूण गवळी, हाजी मस्तान वगैरे तस्कर आणि गुंड हे उघडउघड निवडणुकीच्या राजकारणात उतरले. काही तर तुरुंगात असताना निवडून आले. त्यांच्या भागातील मतदारांसाठी व सर्वसामान्यांसाठी ते परमेश्वरी अवतारच होते. नंतरच्या काळात राजकारण्यांनीच याच्या उलट विचार केला आणि गुंडांना पैसे देऊन आपल्या पदरी पाळण्यापेक्षा आपणच गुंडगिरी केली तर काय वाईट? म्हणून राजकारणीच बरेचसे गुंड आणि भ्रष्टाचारी झालेले दिसतील. कुठेच फारसा पैसा खायला मिळत नसेल, तर अगदी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी उघडउघड पैसे घेणे, सरकार पडत असेल तर सरकारच्या बाजूने मतदान करण्यासाठी पैसे घेणे अशी प्रथा पडली. घोडेबाजाराशी त्याचे नामकरणही झाले. आता तर ग्रामपंचायतपासून तर लोकसभेपर्यंत हा बाजार अगोदर किंवा नंतर भरतो. अशा पैशांची विल्हेवाट लावणे हे मोठे कसबाचे काम आहे. आपल्याच देशात कंपन्यांमध्ये आणि जमिनींच्या व्यवहारांत असे पैसे गुंतविणे, जमिनींच्या व्यवहारांतून पुन्हा पैसे मिळविणे हे सर्रास चालू आहे. फारच मोठी रक्कम असेल तर कोठे ठेवायची. तर स्वीस बँक आहेच! ५० वर्षांपासून असे व्यवहार होत असावेत.

१९९१ नंतर उदारीकरणानंतर भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले, असे मत उदारीकरणाचे विरोधक सतत मांडतात. ढोबळमानाने २जी







स्पेक्ट्रम घोटाळा, कॉमनवेल्थ घोटाळा यांचेच उदाहरण घेतले, तरी ही सर्व उदाहरणे सरकारी घोटाळे आहेत. खासगी घोटाळा फक्त सत्यम कॉम्प्युटर्स या एका कंपनीचा आहे. ग्रामपंचायतपासून लोकसभेच्या खासदारांना मिळणाऱ्या निधीपर्यंत कंत्राटदारांकडून कमिशन खाणे सरकारी कामे कंपन्यांना देताना कमिशन घेणे, असे सर्रास चालू आहे. उदारीकरणाचा बाऊ करण्याचे काहीच कारण नाही. सरकारी घोटाळ्यांबद्दल लोक अधिक उदासिन असतात. एकतर आपण अशा घोटाळ्यांमध्ये सामील होणे मुश्किल आणि ते उघड झाले तर त्याला विरोध करणेही मुश्किल अशी लोकांची भावना आहे. जे तिथे असतील ते तर घोटाळे करणारच आहेत अशी हतबलताही लोकांच्या मनात आहे. भ्रष्टाचार होतो आहे आणि तो सरकारी पैशांचा होतो आहे. आपला त्यात काय तोटा कुणी खात असेल बिचारा तर त्याचे काय भले-बुरे व्हायचे असेल तर ते होईल आपण आपले गप्प बरे किंवा फार तर चर्चा करीत बसणे. उघडउघड एखाद्या आंदोलनात सामान्य जनता विशेषतः मध्यमवर्गीय कुठेही दिसत नाहीत. आंदोलनांची धार कमी होण्याचे हे एक मोठे कारण आहे.

सामाजिक, सांस्कृतिक, जातीय, धार्मिक, लैंगिक, प्रादेशिक, भाषिक अशा गोष्टींबद्दल लोकांच्या मनात जेवढी तीव्र भावना असते व त्यासाठी प्राण गेले तरी बेहत्तर, खूनखराबा, दंगली, आंदोलने केली जातात. राजकीय पक्ष बहुतेकतः अशा आंदोलनाचे नेतृत्वही करतात. भ्रष्टाचारविरोधातील आंदोलनाला मात्र एवढा पाठिंबा मिळत नाही. राजकारणी तर न जाणो कदाचित आपल्याच कुणाचेतरी नाव स्वीस बँकेच्या यादीत यायचे किंवा आपण आपला पक्ष सत्तेत गेलो तर लोकपालांचा कटाक्ष आपल्यावर कशाला म्हणून काहीही बोलत नाहीत.

राज्यसहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर अजित पवारांनी राज्यसहकारी बँक ताब्यात नसेल, सहकारी संस्था ताब्यात नसतील, तेथे प्रशासक नेमला जात असेल, तर मग सत्तेत राहायचे कशाला? अशी प्रतिक्रिया दिली. भ्रष्टाचार आणि सत्तेचा दुरुपयोग हा राज्यसंस्थेचा अंगभूत दोष असला तरी तो कमीतकमी ठेवणे आणि त्यावर जनतेचा अंकुश असणे आवश्यक आहे. सत्ताधाऱ्यांची भाषा मात्र बदलायला लागली आहे. ती आता वरीलप्रमाणे उन्मत्त झाली आहे. भ्रष्टाचार जणू वहिवाट आहे अशी जनतेची खचलेली मानसिकता सत्ताधाऱ्यांना उन्मत्त व्हायला अधिक खतपाणी घालत आहे. त्यातूनच रामदेव बाबा उपोषणाला जाईपर्यंत त्यांच्यासाठी चार चार केंद्रीय मंत्री विमानतळापर्यंत चर्चेच्या पायघड्या घालत असताना त्याच रात्री त्यांच्यावर पोलिस कारवाई होते याचा अर्थ साम-दाम-दंड काहीही वापरू, आंदोलन मात्र चिरडून टाकू आणि ते आम्ही करू शकतो ही राजकारण्यांची भावना झालेली आहे. जनतेने यातून धडा घ्यावा असेच त्यांना सुचवायचे आहे. अण्णांच्या बाबतीत अण्णा लोकशाही कमकुवत करायला निघाले आहेत, अशी टीका केली जात आहे. पंतप्रधान, न्यायाधीश वगैरे उच्चपदस्थांवर लोकपालाचा पहारा ठेवणे योग्य नाही असे असले तरी ही वेळ का आली, याचा विचार अण्णा लोकशाही मोडीत काढायला निघाले आहेत असे म्हणणाऱ्यांनी करायला हवा. संसदेत निवडून गेलेल्या प्रतिनिधींनी कायदेकानून बनवावेत हेच त्यांचे काम आहे. ते प्रतिनिधीगृहात हजर तरी असतात का? सत्तेतून लाभलेल्या वलयामुळे बाहेरचे वैयक्तिक व्यवहार अधिकाधिक सुरळीत पार पाडण्यासाठी आपल्या प्रतिनिधीत्वाचा वापर करण्यात ते गढून गेले आहेत. कायद्यांचा अभ्यास करणे, जुने कायदे मोडीत काढणे, नवे कायदे करणे अशी कामे प्रतिनिधींची आहेत. ही कामे ते करतात, की वैयक्तिक लाभाची कामे प्रतिनिधीगृहातून गैरहजर राहून करतात हे जर बघितले तर लोकशाही मोडीत काढली जात आहे असा कांगावा करणाऱ्यांना तेथे बसणेही मुश्किल होईल. प्रतिनिधीगृहात हे लोक किती वेळा बोलले, चर्चेत किती वेळा सहभाग घेतला हे जर उघड झाले. तर त्यातून त्यांचा नाकर्तेपणा सिद्ध होईल. लोकशाही मार्गाने निवडून गेलेल्या प्रतिनिधींनीच लोकशाहीचे धिंडवडे काढले आहेत. तेच आता 'अण्णा लोकशाहीला आव्हान देत आहेत' अशी हाकाटी देत आहेत. एका एका प्रतिनिधीगृहात पाचपाचशे प्रतिनिधी बसलेले आहेत. गावपातळीपर्यंत लोकप्रतिनिधी आहेत, मग अण्णांची आणि बाबांची गरज काय? लोकांना आजही अण्णा हजारेच भ्रष्टाचार उघडकीस करतील किंवा रामदेव बाबाच स्वीस बँकेतून पैसे आणले तर आणतील असे का वाटते? हे लोकप्रतिनिधींनी स्वयंमूल्यमापन करून ठरवावे.

ज्ञानेश्वर शेलार


# जावे शेतकऱ्याच्या वंशा

**शेतकरी शेती करतो म्हणजे नेमकं काय करतो? त्याला उत्पादकांत धरायचं की नाही? शेतीसाठी जे निरनिराळे इनपुटस् लागतात त्यातलं एक इनपुट शेतकरी आहे. त्याला पूर्णपणे उद्ध्वस्त केलं तर शेतीच संपेल आणि मग साडेनऊ हजार वर्षांच्या व्यवस्थेवर पुढच्या पाचशे वर्षांच्या व्यवस्थेचं जे शिखर आहे, ते आपोआप कोसळेल. त्याच्या नाकातोंडापर्यंत पाणी येईल, पण नाक पाण्याच्या वर राहील असंच ठेवलं पाहिजे. याला अपवाद जगाच्या इतिहासात नाही. हे माझ्या लक्षात यायला लागलं तेव्हा एका अर्थाने मला शेतकरी चळवळीत काम करणं निरर्थक वाटायला लागलं.**

हा लेख लिहीत असताना मला महान शास्त्रीय गायक पंडित भीमसेन जोशी यांचं एक वाक्य आठवतं. एका मुलाखतीत भीमसेन म्हणाले होते, की मी आयुष्यभर यमन गातोय, तरी मला यमन राग पूर्णपणे समजलाय असं वाटत नाही. शेती आणि शेतकरी या विषयावर लिहिताना माझी स्थिती फारशी वेगळी नाही. १९८१ पासून आजपर्यंत म्हणजे गेली ३० वर्षं शेतकरी संघटनेत काम केलं, तरीही शेती आणि शेतकरी (विशेषतः भारतीय शेतकरी) या प्रश्नाचं पूर्णतः व निर्णायक आकलन मला झालेलं आहे, असं वाटत नाही. इथे हेही सांगितलं पाहिजे, की ते मला झालेलं नाही, त्याप्रमाणे कोणालाही झालेलं नाही असं माझं स्पष्ट मत आहे. यात खुद्द शेतकरी आले, शेतकऱ्यांचे नेते आले, शेतकरी राजकारणी आले, आंदोलक शेतकरी आले, ज्यांना आपण शेतीतज्ज्ञ म्हणतो ते आले, शेती शास्त्रज्ञ आले, अर्थशास्त्रज्ञ आले, सरकारी यंत्रणेमधून निरनिराळ्या शेतीसंबंधित खात्यांत काम करणारे लोक आले, शेतमालावर प्रक्रिया करणारे साखर कारखानदार व सूत गिरणीवाले आले आणि ज्यांनी शेतकऱ्यांच्यावर बरं-वाईट साहित्य लिहिलं असे शेतकरी लेखक व बिगर शेतकरी लेखकही आले. शेतकऱ्यांचा वेगळा इतिहास लिहिला गेला आहे, असं माझ्या पाहण्यात आलेलं नाही; पण लिहिला गेला असेल तर ते इतिहासकारही याच कुंठित वर्गात सामील करावे लागतील.

दुसरं असं आहे, की 'साधना'च्या वाचकवर्गाला 'शेती आणि शेतकरी' हा विषय जाणून घ्यायचा असेल तर खूप वेगळा विचार करायला शिकावं लागेल. कारण 'शेती संस्कृती' निदान आठ-दहा हजार वर्षं इतकी जुनी आहे आणि औद्योगिक संस्कृती पाचशे वर्षांपेक्षा जुनी नाही. ज्याला आपण तंत्रज्ञानावर आधारलेली संस्कृती म्हणतो ती गेल्या शंभर वर्षांतली आहे. आणि माहिती-तंत्रज्ञानावर आधारलेली संस्कृती तर गेल्या पंचवीस-तीस वर्षांतली आहे. त्यामुळे हा मोठा विचित्र प्रकार आहे की, गेल्या दहा हजार वर्षांपासून जी संस्कृती अस्तित्वात आहे तिच्यावर बोलणारी माणसं - गेल्या पाचशे वर्षांच्या औद्योगिक संस्कृतीचा परिचय असलेली व गेल्या पन्नास वर्षांतील माहिती-तंत्रज्ञानाने पछाडलेली आहेत. ही माणसं साडेनऊ हजार वर्षांचा काहीही इतिहास माहीत नसताना या प्रश्नावर बोलतात; आणि कुठलाही शेतीविषयक परिसंवाद ऐकला किंवा पुस्तक वाचलं किंवा एखादा विशेषांक पाहिला की ज्यांचा जीव खरं म्हणजे फार लहान आहे ती माणसं शेती आणि शेतकरी या विषयावर अतिशय आत्मविश्वासाने बोलताना दिसतात. अशीच चूक युनोची स्थापना झाली त्या वेळीही झाली होती. मानवजातीचा युद्धाचा म्हणजे रक्तपाताचा इतिहास आपण एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करून बदलून टाकू, असा निरर्थक भ्रम युनोची स्थापना करताना होता. तसाच, आम्ही सर्व शहाणे लोक शेती आणि शेतकरी यांना सल्ला देऊ आणि त्यांचे प्रश्न सोडवू हा भ्रमही तितकाच व्यर्थ आहे!

आणखी एक सांगायला पाहिजे, शेतीविषयीची चर्चा 'सात आंधळे आणि हत्ती' या चावून चोथा झालेल्या कथेसारखीच आहे. म्हणजे प्रत्येकाला शेती संस्कृतीचं एखादं अंग सापडलेलं असतं, कोणालाही संपूर्ण हत्ती सापडला आहे असं दिसत नाही. याचं कारणच असं की, साडेनऊ हजार वर्षांचा वेध घेण्याची प्रतिभा असलेला विचारवंत दुर्दैवाने आजपर्यंत ना शेतकऱ्यांतून निर्माण झाला, ना बिगर शेतकरी वर्गातून निर्माण झाला. मग त्यातूनच निरनिराळे भ्रम पैदा होतात.



विनय हर्डीकर

पहिला भ्रम, शेती हा विज्ञानाचा (मुख्यतः जैवविज्ञानाचा) विषय आहे. म्हणजे शेतीची शास्त्रीय प्रक्रिया समजावून घेऊन त्यामध्ये संशोधन करणं आणि अधिक उत्पादन देणारी



बियाणी विकसित करणं, हा शेतीच्या प्रश्नावर उपाय आहे. हा एक उपाय आहे, हे मी मान्य करीन, पण हा एकमेव उपाय आहे असं जे मांडलं जातं त्यासंबंधी माझ्या मनात जबरदस्त शंका आहे. दुसरं असं की शेतीचा प्रश्न, लागवडीचं क्षेत्र लहान आहे की मोठं आहे, यावर अवलंबून आहे. याबाबत दोन मतं आहेत - एक : क्षेत्र जितकं लहान तितकी शेती तोट्याची होते - हा पुन्हा औद्योगिक संस्कृतीने दिलेला नियम आहे, की मास प्रॉडक्शनमुळे प्रॉडक्शन कॉस्ट कमी होते. हे कारखान्यात घडू शकेल, पण प्रत्यक्ष शेतीत घडू शकेल का, याचा विचार जितका व्हायला हवा तितका झालेला नाही. आता शेती जर लहान ठेवायची नसेल तर साहजिकच तुम्हांला जमीनदारी प्रथेकडे जावे लागेल. पण जमीनदार आणि मोठा शेतकरी हाच शेतकऱ्यांच्या प्रश्नातील खरा आरोपी आहे, आणि म्हणून तोच नष्ट केला पाहिजे असं म्हणणाऱ्यांना, जमीनदारी नष्ट केली तर तुकड्या-तुकड्यांचीच शेती शिल्लक राहणार आहे इतकं साधं व्यावहारिक भान राहत नाही.

आम्ही शेतकरी संघटनेत, शेतमालाचा उत्पादन खर्च हा व्यावहारिक पद्धतीने म्हणजे शेती करताना जे इनपुटस् लागतात त्यांच्या बाजारातील किमती आणि शेतकऱ्यांच्या श्रमाचं मोल गृहीत धरून काढत असतो. हे आमचं म्हणणं. पण दुसरा एक पक्ष आहे, त्याचं म्हणणं असं, की या पद्धतीने विचार केला तर शेतीचा उत्पादन खर्च सतत वाढतच राहील, त्याऐवजी शेतीच्या इनपुटस्ची किंमत कमी ठेवावी म्हणजे शेतीचा उत्पादन खर्च आपोआपच कमी राहील. या भ्रमाच्या मुळाशी आणखी एक भ्रम आहे. शेतीचा उत्पादन खर्च वाढता कामा नये, कारण शेतीमालाचे बाजारभाव वाढता कामा नयेत. ज्या प्रमाणात इतर उपभोग्य वस्तूंच्या किमती वाढल्यावर आरडाओरडा होतो (पेट्रोलच्या किमती, वाहनांच्या किमती) त्यापेक्षा कितीतरी जास्त आरडाओरडा शेतमालाचे भाव वाढवल्यावर होतो. विशेष म्हणजे शेतकरी सोडला तर इतर सर्व घटकांचे उत्पन्न वा पगार सतत वाढतच असतात, तरी हा आरडाओरडा होतो; आणि शेतमालाचे भाव कमी ठेवण्यासाठी शेतकऱ्याला सल्ला दिला जातो, उत्पादन खर्च कमी ठेवला पाहिजे. तू भरमसाट खतं वापरतोस, ती वापरू नकोस. ही महागडी बियाणी वापरू नकोस, तो आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा कट आहे. ही खतं-बियाणं वापरलीस तर भरपूर पाणी द्यावं लागतं, भरपूर पाणी दिलं तर जमिनीतले क्षार वर येतात, जमीन नापीक होते. यावर तूच उपाय शोधून काढ. म्हणजे शेतकऱ्यांच्या आवाक्यात नसलेल्या प्रश्नावरही उपाय त्यांनीच शोधून काढावा, आणि ते काढू शकतील हा एक भ्रम.

अजून एक असा भ्रम आहे, की एकूण सगळीकडे शेती सारखीच असते. हवामानाचा, जमिनीच्या प्रतीशी फार महत्त्वाचा संबंध आहे, त्यामुळे शेतीविषयक नियमांची एक चौकट ही सर्व प्रकारच्या शेतीला लावता येणार नाही, हे तर कोणीच लक्षात घेताना दिसत नाही. उदा. जे देश उत्तर-दक्षिण असे जास्त पसरलेले दिसतात, त्यांच्यामध्ये पिकांचे प्रकार, शेतीची प्रत, पाणी पुरवठा, हवामान या सर्वांमध्ये इतका फरक असतो (भारत त्या देशांच्यापैकी आहे) की त्या देशांमध्ये अशी शेतीविषयक नियमांची चौकट करता येत नाही. पूर्व-पश्चिम विस्तार असलेले देश जगात तुलनेने जास्त आहेत, तिथे एकाच प्रकारचं हवामान जास्त सापडू शकतं. उत्तर- दक्षिण जास्त पसरलेले असे तीन देश आहेत. एक चिली, पण चिलीचं मुख्य उत्पादन हे शेती उत्पादन नाही. दुसरा भारताइतकाच औरस-चौरस देश ब्राझील आहे. पण ब्राझीलची एकूण लोकसंख्या आणि त्या मानाने उपलब्ध असलेली जमीन व जंगल हे भारतात तीन-चार हजार वर्षांपूर्वी जसं असेल त्या पातळीवर आहे. त्यामुळे भारताशी तुलना करावा असा देशच नाही. भारतात एक सलग पट्टा असा मिळत नाही. फार-फार तर असं म्हणता



**आम्ही शेतकरी संघटनेत, शेतमालाचा उत्पादन खर्च हा व्यावहारिक पद्धतीने म्हणजे शेती करताना जे इनपुटस् लागतात त्यांच्या बाजारातील किमती आणि शेतकऱ्यांच्या श्रमाचं मोल गृहीत धरून काढत असतो. हे आमचं म्हणणं. पण दुसरा एक पक्ष आहे, त्याचं म्हणणं असं, की या पद्धतीने विचार केला तर शेतीचा उत्पादन खर्च सतत वाढतच राहील, त्याऐवजी शेतीच्या इनपुटस्‌ची किंमत कमी ठेवावी म्हणजे शेतीचा उत्पादन खर्च आपोआपच कमी राहील. या भ्रमाच्या मुळाशी आणखी एक भ्रम आहे. शेतीचा उत्पादन खर्च वाढता कामा नये, कारण शेतीमालाचे बाजारभाव वाढता कामा नयेत. ज्या प्रमाणात इतर उपभोग्य वस्तूंच्या किमती वाढल्यावर आरडाओरडा होतो (पेट्रोलच्या किमती, वाहनांच्या किमती) त्यापेक्षा कितीतरी जास्त आरडाओरडा शेतमालाचे भाव वाढवल्यावर होतो. विशेष म्हणजे शेतकरी सोडला तर इतर सर्व घटकांचे उत्पन्न वा पगार सतत वाढतच असतात, तरी हा आरडाओरडा होतो; आणि शेतमालाचे भाव कमी ठेवण्यासाठी शेतकऱ्याला सल्ला दिला जातो...**

येतं की दिल्लीपासून सुरू होणारा गंगा-यमुना या नद्यांच्या आसपासचा एक सलग पट्टा आहे. इतर प्रत्येक ठिकाणची पिकं वेगळी, उत्पादन खर्च वेगळा आहे. प्रत्येक ठिकाणच्या शेतीचं वेळापत्रकसुद्धा वेगळं आहे. आम्ही तीस वर्षं काम करूनसुद्धा, भारतातील सर्व शेतकरी काम बंद ठेवू शकतील असा वर्षभरातला एक दिवस आम्हाला मिळालेला नाही. याचं कारण, उत्तर-दक्षिण विस्तारामुळे हवामान व जमीन यांच्यात भिन्नता येते, त्यामुळे शेतीचं वेळापत्रक बदलतं आणि त्यामुळे भारतातील शेतकऱ्यांच्या बाबतीत एक सर्वंकष/सर्वस्पर्शी धोरण लागू करता येत नाही. डोंगराळ भागातल्या शेतकऱ्यांचा वेगळा विचार करावा लागतो, मैदानी भागातल्या शेतकऱ्याचा वेगळा विचार करावा लागतो, प. महाराष्ट्राच्या पूर्व भागातल्या खडकाळ व बऱ्यापैकी अवर्षणग्रस्त प्रदेशातील शेतीचा वेगळा विचार करावा लागतो. जंगलही वाचवलं पाहिजे आणि तिथली शेतीही वाचवली पाहिजे असा विचार काही भागांत करावा लागतो. असाही काही भाग असतो, जिथे जंगल हे सतत शेतीवर आक्रमण करत असतं, त्या प्रदेशाचाही वेगळा विचार करावा लागतो. काही ठिकाणी संमिश्र प्रदेश असतो. उदा. मध्यप्रदेशात भरपूर पावसाचा प्रदेश मिळेल, दुष्काळी प्रदेशही मिळेल, जंगलाजवळची शेती असा प्रदेश मिळेल आणि मोठ्या नद्यांजवळची शेती असाही प्रदेश मिळेल. या चारपाच प्रकारच्या शेतींसाठी एकच धोरण आखता येईल आणि राबवता येईल हाही मोठा भ्रम आहे.

अजून एक भ्रम असा आहे, की शेतीतल्या दारिद्र्याचे मुख्य कारण शेतीच्या वितरणाची अवस्था चांगली व प्रामाणिक नसणं. या भ्रमाचं आपल्याकडचं मुख्य स्वरूप म्हणजे, शेतकऱ्यांचे मुख्य शत्रू दलाल आणि खाजगी सावकार आहेत. सर्व समाजवादी पद्धतीचे विचार, शेतकऱ्यांचे शत्रू म्हणून दलाल व सावकार यांच्याकडे बोटं दाखवतात. हाही भ्रम आहे. खाजगी सावकार व दलाल यांना खलनायक म्हणून रंगवणं हे शेतकऱ्यांनीही कधी मान्य केलेलं नाही. यांना खलनायक म्हणून रंगवण्याचं गौडबंगाल जे लोक दुरून शेती पाहतात त्यांनी निर्माण केलं. मला असं म्हणायचं नाही, की दलाल आणि सावकार हे मोठे मानवतावादी असतात. पण ते दृश्यशोषण आहे. दलाल आणि सावकार हे व्यवसाय म्हणून, उपजीविकेचा भाग म्हणून त्याकडे पाहतात. शिवाय, त्यांची रिस्क इतरांपेक्षा जास्त असते. त्यांना हटवलं आणि त्यांच्या जागी सरकारी यंत्रणा आणली तर तोही उपाय चालत नाही, हा अनुभव आपण घेतला आहे. तरीही शहरी सुशिक्षित व शहरी संशोधक हे दलाल आणि खाजगी सावकार यांच्या नावाने ओरडत असतात. ही ओरड सरकारच्या पथ्यावर पडते, कारण त्यामुळे सरकारकडून होत असलेलं शोषण आपोआप झाकलं जातं, अप्रस्तुत ठरवलं जातं. म्हणजे दलाल व सावकारांना खलनायक ठरविण्यामुळे, एका अर्थाने आपण शेतकऱ्यांना लुटणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेला मदत करतो आहोत, हेसुद्धा अनेकांच्या लक्षात येत नाही. त्यांच्याकडून होत असलेल्या प्रत्यक्ष शोषणामुळे त्यांना खलनायक ठरवणं सोपं आहे आणि दोन्ही पक्षांच्या सोयीचंही आहे.

अजून एक भ्रम (विशेषतः भारतीय शेतकऱ्यांबद्दल) असा आहे की, शेतकरी हा अडाणी असतो, आळशी असतो, विचाराने प्रतिगामी असतो - त्यातल्या त्यात शेतमालक. म्हणजे दलाल आणि सावकार यांच्या खालोखाल तिसरा खलनायक शेतमालक असतो. शेतकऱ्यांच्या एकत्र कुटुंबातील सर्वांत मोठा भाऊ हा खलनायक असतो. तो कुणालाही सुखाने जगू देत नाही, जोपर्यंत त्याच्या हातात कारभार असतो - तोपर्यंत शेती फायद्यात येणार नाही, शेतकरी सुखी होणार नाही अशीही मांडणी केली जाते. ती खरी नाही. आणि हीच मांडणी करणारे लोक अशीही मांडणी करतात की, ग्रामीण भागात प्रदूषण नसतं, त्यामुळे हवा शुद्ध असते, पाणी चांगलं असतं. त्यामुळे तिथे सौख्य-आरोग्य यांची रेलचेल असते. या दोन्ही भूमिका एकाच वर्गातील माणसं मांडू शकतात, याचं कारण या विषयाचं आकलन फार वरवरचं, एकांगी आणि मर्यादित झालेलं आहे.

भारतीय शेतकऱ्यांपुरतं बोलायचं तर सर्वसाधारण असं दिसतं की भारतीय शेतकऱ्यांची उपासमार होईल अशी परिस्थिती कधीच नसते. म्हणजे अगदी सोळाव्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनी स्थापन होते, याचं कारण इथे भरपूर शेतीमाल उपलब्ध

होता. पण बारकाईने पाहिलं तर असं दिसेल की, भारताचा इतर जगाशी जो व्यापार होत होता त्यात शेतीमाल फारसा नव्हता. तर त्यात मुख्यतः कापूस, मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, काही प्रमाणात सोनं (युरोपीयन देशांना आफ्रिकेतलं सोनं सापडण्यापूर्वी), रुपं आणि मीठ मोठ्या प्रमाणात होतं. त्याच काळात लोकसंख्या मर्यादित होती आणि अन्नधान्य फारसं बाहेर जात नव्हतं. त्यामुळे सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत भारतात उपासमार नव्हती. त्या काळी शेतकरी अत्यंत कार्यक्षम होता आणि नंतर तो अकार्यक्षम व अडाणी झाला आणि शेतमालाचे भाव वाढायला लागले, त्यावर उपाय म्हणजे त्याला आधुनिक पद्धतीने शेती करायला लावली पाहिजे ही मांडणी खरी नाही. पूर्वी लोकसंख्येच्या मानाने शेती उत्पादन भरपूर होतं, अन्नधान्याची निर्यात नव्हती आणि अन्नधान्याचे भाव आवाक्याबाहेर जात नव्हते आणि त्यामुळे सुबत्ता होती. इंग्रजांच्या काळापर्यंत ही परिस्थिती कायम होती. उदा. श्री.म. माटे यांनी असं लिहिलंय, की बाजारात गेलं तर शेती उत्पादन मोजून घेण्याची पद्धतच नव्हती. रास असायची आणि ही केवढ्याला घेता, असा व्यवहार व्हायचा. माटे यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास नव्हता, पण आकलन चांगलं होतं. आपल्या गावाच्या-पंचक्रोशीच्या बाहेर नेऊन माल विकणं शक्यच नसायचं. त्यामुळे जे काही असेल ते त्या दिवशी त्याच बाजारात विकलं गेलं नाही तर परत नेण्याचा खर्च परवडणार नाही. शेतकऱ्याचं औदार्यही यातूनच आलं. हल्ली एक तक्रार मोठ्या प्रमाणात ऐकायला येते की, पूर्वी ग्रामीण भागात गेलं की जेवणाची चिंता करावी लागत नसे. तिथेही शेतकऱ्याच्या औदार्याचा भाग कमी होता आणि शेतमालाला जवळपास बाजार व भाव नसण्याचा भाग मोठा होता. या गोष्टी शेतकऱ्यांच्याही लक्षात येत नाहीत. मग ते शेतकऱ्यांच्या घरी जाऊन पुख्खा झोडण्याची अपेक्षा ठेवणाऱ्यांच्याही सोयीचं नाही व कुणालाच परवडणारं नाही. त्यामुळे या संदर्भात खूपच खोलात जाऊन विचार करावा लागेल.

जगाच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाचं माझं जे आकलन आहे, त्यात कुठेच शेतकरी सुखी होता आणि त्याचा सन्मान होत होता असं दिसत नाही. (तो खाऊन-पिऊन सुखी होता हे मात्र खरं आहे) त्याचं मुख्य कारण तात्त्विक आहे आणि त्याला कुणीही हात घातलेला नाही. शेती म्हणजे नेमकं काय? शेतीचं जे उत्पादन होतं, त्यामध्ये गुणाकार होतो, कणाचा मण होतो वगैरे... शेतीच्या वाढाव्यातून (सरप्लस) व्यापार युग आलं. व्यापार युगाला दर्यावर्दी साहसाची जोड मिळाली आणि मग जागतिक व्यापार सुरू झाला. त्या व्यापारातून नफा आला, त्यातून भांडवल तयार झालं. त्यातून अठराव्या शतकात भांडवलशाही निर्माण झाली, त्यातून वसाहतवाद आला, कारखानदारी आली. वसाहतवादी व भांडवलशाही यांच्या शोषणाचा परिणाम म्हणून समाजवाद आला वगैरे सर्व इतिहास गेल्या पाचशे वर्षांतील असल्यामुळे सगळ्यांना बऱ्यापैकी माहीत आहे. पण शेती म्हणणे नेमकं काय, याचं काय उत्तर आहे? आपल्याकडे शाळेत एक गणित असतं (आमच्या वेळी तरी असायचं) की, अमुक मारवाड्याने इतकी लिंबं शेतकऱ्याकडून या भावाने विकत घेतली, नंतर ती लिंबं तीन वेगवेगळ्या भावांनी विकली तर त्याला फायदा वा तोटा किती झाला? खरं गणित त्याच्या आधी आहे. मारवाड्याने शेतकऱ्याकडून ज्या भावाने लिंबं घेतली त्यात शेतकऱ्याला तोटा



**मुळात हा तात्त्विक प्रश्न आहे. तुम्ही जर औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत कच्चा माल, श्रम, भांडवल, व्यवस्थापन आणि मार्केटिंग या पाचही ठिकाणी त्या-त्या लोकांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे असं म्हणत असाल तर तो नियम तुम्ही शेतीला का लागू करत नाही? करत नाही ही वस्तुस्थिती आहे. आम्ही शेतकरी संघटनेत असताना काही बिगरशेती मालाचे उत्पादक/ कारखानदार म्हणत की आम्हांला योग्य नफा येणारा भाव मिळत नसेल तर आम्ही माल बाजारातच आणत नाही. शहरी तज्ज्ञांचं म्हणणं असं होतं, की तुम्हांला परवडत नसेल तर तुम्ही शेती करू नका, तुमच्यावर कोणी सक्ती केली आहे का? आता हा नियम कसा आहे तर, एक नोकरी जमत नसेल तर दुसरी नोकरी बदलता येण्याची शक्यता शहरात असते, तशी शेती बदलता येत नाही.**

झाला, की फायदा झाला हे मूळ गणित आहे. ते गणित मांडलं जात नाही. त्याचं कारण असं की, डोळ्याला दिसतं तिथपर्यंत शेती उत्पादन ही निसर्गाची किमया आहे, परमेश्वराची कृपा आहे किंवा काळ्या आईने आपल्यावर केलेलं प्रेम आहे. समजा, खरंच कणाचा मण होत असेल तर त्यात शेतकऱ्याचा नेमका वाटा किती, या प्रश्नाला कोणीही हात घातलेला नाही. किंवा या प्रश्नाचं एक उत्तर ठरलेलं आहे. जे उत्तर भांडवलशाहीने कारखान्यात काम करणाऱ्या मजुराला दिलं होतं, तेच उत्तर शेतकऱ्यांच्या बाबतीत दिलं जातं. ते म्हणजे, शेतकऱ्यांचं पोट भागलं तर उरलेल्या उत्पादनावर त्याचा अधिकार नाही. ही मूल्यव्यवस्था बदलायला आपण तयार आहोत का?

हे त्याचं मूल्य नाकारायचं होतं म्हणून निरनिराळ्या प्रकारचे युक्तिवाद केले गेले. लाखांचा पोशिंदा अशी पदवी शेतकऱ्याला बहाल केली आहे. तुला काय कमी आहे, तू तर काळ्या आईचा लाडका मुलगा. सुशिक्षितांची व्हॅल्यू सिस्टिम तर बघा कशी आहे... कारखान्यात घाम गाळला तर त्याला शोषणाची दुर्गंधी येते आणि शेतीत घाम गाळला तर ते काळ्या आईचं उतराई होणं असतं. शेतकऱ्यांच्या घामाचा घाण वास कधी कुणाला आलाय?

(शेतकऱ्याला येत असेल!) आपण शेतीसंस्कृतीचं उदात्तीकरण केलं. शेतकऱ्यांच्या घामाला सुगंध येतो आणि कारखान्यातल्या घामाला दुर्गंध येतो, हा काय प्रकार आहे? ही मुळात मूल्यव्यवस्थेतील गफलत आहे. कुठे शेतकऱ्याला उदात्त केलं, कुठे त्याला आळशी ठरवलं, कुठे शेतकऱ्याला सरळसरळ लुटलं आणि लुटल्यानंतर गुलाम बनवलं. एखादाच शिवाजीसारखा राजा, त्याने नियम केले की शेतातून घोडी घालू नका, पिकांचा नाश करू नका आणि गावोगावी जाता तेव्हा लागेल ते विकत घ्या. पण शिवकालात सुद्धा पैसे देऊन रोख विकत घेतलं नाही म्हणून कोणाला शिक्षा झाली, असं उदाहरण पाहायला मिळत नाही.

मग शेतकरी शेती करतो म्हणजे नेमकं काय करतो? त्याला उत्पादकांत धरायचं की नाही? शेतीसाठी जे निरनिराळे इनपुटस् लागतात त्यातलं एक इनपुट शेतकरी आहे. त्याला पूर्णपणे उद्ध्वस्त केलं तर शेतीच संपेल आणि मग साडेनऊ हजार वर्षांच्या व्यवस्थेवर पुढच्या पाचशे वर्षांच्या व्यवस्थेचं जे शिखर आहे, ते आपोआप कोसळेल. त्याच्या नाकातोंडापर्यंत पाणी येईल, पण नाक पाण्याच्या वर राहील असंच ठेवलं पाहिजे. याला अपवाद जगाच्या इतिहासात नाही. हे माझ्या लक्षात यायला लागलं तेव्हा एका अर्थाने मला शेतकरी चळवळीत काम करणं निरर्थक वाटायला लागलं. शेतकऱ्याच्या उत्पादनावरचा त्याचा मालकी हक्क कुठेच मान्य झालेला नाही. उलट ती शेती करणं, त्यातून उत्पादन काढणं हे तुझं काम आहे आणि आम्ही देऊ तो मोबदला तू घेतला पाहिजेस. नाही तर आम्ही तुला गुलामगिरीच्या सापळ्यात अडकवू किंवा तुझं उदात्तीकरण करून तुला सांस्कृतिक गुंगीमध्ये ठेवू किंवा (आता भारतात झालंय तसं) तुला कर्जाच्या जाळ्यात असं अडकवू की त्यातून तू बाहेर येऊ शकणार नाहीस. 'भारतातला शेतकरी कर्जातच जन्माला येतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो' ही म्हण फार जुनी नाही! ही म्हण आधुनिक अर्थव्यवस्था आल्यानंतरचीच आहे. हे कर्ज कशामुळे होतं? तर ही जी व्यवस्था आहे, की शेतकऱ्याला त्याच्या पोटापेक्षा जास्त शेतातून काही मिळणार नाही. जेव्हा जेव्हा भांडवली खर्च उभा राहतो, तेव्हा पूर्वी शेतकरी खाजगी सावकारांकडे जात होता, आता कुठल्या तरी बँकेकडे जातो आणि एक वेळ खाजगी सावकार परवडला इतकं बँकांनी शेतकऱ्यांना छळलेलं आहे. याची आम्ही अनेक वेळा आकडेवारी दिली आहे.

तर मुळात हा तात्त्विक प्रश्न आहे. तुम्ही जर औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत कच्चा माल, श्रम, भांडवल, व्यवस्थापन आणि मार्केटिंग या पाचही ठिकाणी त्या-त्या लोकांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे असं म्हणत असाल तर तो नियम तुम्ही शेतीला का लागू करत नाही? करत नाही ही वस्तुस्थिती आहे. आम्ही शेतकरी संघटनेत असताना काही बिगरशेती मालाचे उत्पादक/कारखानदार म्हणत की आम्हांला योग्य नफा येणारा भाव मिळत नसेल तर आम्ही माल बाजारातच आणत नाही. शहरी तज्ज्ञांचं म्हणणं असं होतं, की तुम्हांला परवडत नसेल तर तुम्ही शेती करू नका, तुमच्यावर कोणी सक्ती केली आहे का? आता हा नियम कसा आहे तर, एक नोकरी जमत नसेल तर दुसरी नोकरी बदलता येण्याची शक्यता शहरात असते, तशी शेती बदलता येत नाही. आपण असं धरून चालू, की जो शेतकरी ज्वारीची शेती करतो त्याच्याकडे एकदम वृक्ष शेती, वन शेती, फळांची शेती, भाजीपाल्याची शेती करण्यासाठी इतर इनपुटस् आहेत. पण पिढ्यान्‌पिढ्यांकडून आलेली शेतीमधील कौशल्यं जनुकशास्त्राच्या नियमाने दिलेली असतात. आणि दुसरं म्हणजे निसर्ग बदलल्याशिवाय पीक बदलता येणं शक्य नाही. त्या त्या नैसर्गिक पट्ट्यात ती ती पिकं घेणंच शक्य असतं. म्हणून हजारो वर्षं लोक ती घेत असतात.

कोकणचा कॅलिफोर्निया करा, माळरानावर हजारो एकर द्राक्षाच्या बागा लावून टाका हे शक्य नाही. कारण हवामानाचे पट्टे आणि जमिनीची प्रत यावर शेती अवलंबून असते. त्यामुळे 'इस्रायलने वाळवंटात नंदनवन फुलवलं' याच्याइतका भंपक सल्ला भारतीय शेतकऱ्यांसाठी दुसरा नाही. अमेरिकेने इस्रायलच्या वाळवंटात जो पैसा ओतला त्याच्या एकशतांश पैसादेखील भारतीय शेतीत ओतायला कोणी तयार नाही. आणि असे जे चुकीचे उपाय राबवून पाहतात (उदा. माळरानावर नंदनवन) ते कधी आपले हिशोब सांगत नाहीत. आणि त्यांनी आपले हिशोब सांगू नयेत म्हणून त्यांना शेतीनिष्ठ, कृषिभूषण वगैरे पदव्या देऊन शेतकऱ्यांना लुटणाऱ्या व्यवस्थेकडून आपल्यात सामील करून घेतलं जातं. त्यामुळे हे जे शास्त्रीय किंवा अर्थशास्त्रीय पद्धतीचे उपाय सुचवले जातात त्यांनी एखाद-दुसरं अपवादात्मक यश मिळवता येतं पण संपूर्ण शेती (काय म्हणावं - शेतीउद्योग, शेतीसंस्कृती, शेतीव्यवस्था) त्या मार्गाने करता येणार नाही.

गावगाडा शेतकऱ्याच्या बाजूने आहे का? असंही म्हणण्याची पद्धत आहे की या आधुनिक शेतीमुळे शेतकऱ्याची अवस्था वाईट झाली आहे, गावगाड्यामध्ये तो सुखी होता! तुम्ही त्रिंबक नारायण अत्रे यांचं 'गावगाडा' हे पुस्तक काढून पाहा, त्यात गावगाड्यातसुद्धा मध्यम शेतकऱ्याची लूट करणाऱ्यांची लांबलचक यादी आहे. ती लेव्ही सिस्टिमच होती. लेव्ही सिस्टिमचा अर्थ काय तर, ज्या वेळी भरपूर पीक येईल तेव्हा सरकार त्यात लक्ष घालणार नाही, तुम्ही आणि गिऱ्हाईक बघून घ्या! मात्र दुष्काळ पडला तर शेतकऱ्याकडून सक्तीने लेव्ही वसूल करणार. काही उदाहरणं तर अशी आहेत की, दुष्काळ पडल्यावर शेतकऱ्यांनी धान्य विकत घेतलं आणि लेव्ही भरण्यासाठी सरकारात जमा केलं नाही, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जात असे. बलुतेदारी व्यवस्था आदर्श होती असं म्हणणाराही एक वर्ग आहे. पण त्यातही हाच दोष होता, की पीक येईल न येईल बलुतं दिलं पाहिजे. मग ती व्यवस्था आदर्श होती असं का मांडलं जातं पुन्हा पुन्हा? याचं कारण अज्ञान किंवा शेतकऱ्यांबद्दल दोनशे टक्के अनास्था या दोन्हींपैकी वेगळं असू शकत नाही.

भारतातील सुशिक्षित वर्गाचा एक समज असा आहे की शेतकरी हे सरकारचे लाडके आहेत. त्यामुळे त्यांना इन्कम टॅक्स नाही, वीज मोफत, बियाणं व खतं यावर सबसिडी असल्याने शेतमालाचे भाव नेहमी कमी असायलाच हवेत. वस्तुस्थिती अशी आहे की बियाणं, खतं, औषधं यांना ज्या सबसिडीज दिल्या त्या ती उत्पादनं करणाऱ्या कारखानदारांना मिळाल्या आणि त्यांचे उत्पादनाचे खर्च कमी राहिले. आणि या वस्तू ज्या काळात लागतात त्या काळात त्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करून त्यांनीच शेतकऱ्यांना लुबाडलं. कुठल्याही गावात याच्या अनेक कहाण्या ऐकायला मिळतील. बियाणं स्वस्त आहे - पिशवीवर छापलेली किंमत कमीच असते. पण बियाणंच नाही आणि दोन दिवसांत पेरणी तर झाली पाहिजे अशा वेळेला काय होत असेल, हा कोणत्याही शहाण्या माणसाने विचार करण्याचा प्रश्न आहे. विजेचं

कनेक्शन मिळवण्यासाठी किंवा पाटाचं पाणी मिळवण्यासाठी किती भ्रष्टाचार होतो हे सांगायची गरज नाही. आणि पाटाचं पाणी आहे पण वीज नाही किंवा वीज मध्यरात्रीच उपलब्ध आहे असे बारके-सारखे किती तरी मुद्दे आहेत, जिथे भ्रष्टाचाराला संधी मिळते.

सरकार सर्व धान्य खरेदी करेलच ही झाली घोषणा. पण सरकारी अधिकारीच 'आज काटा बिघडलाय', 'आज ग्रेडर आलेला नाही', 'आज सुट्टी आहे' अशा क्लृप्त्या वापरून, पडत्या भावाने व्यापारी माल विकत घेतील अशी व्यवस्था करतील आणि त्यातून पैसे काढतील. अशा असंख्य गोष्टी आहेत. आपली कुठलीही व्यवस्था चोख काम करणारी नाही. सहकारी साखर कारखाने घ्या, सहकारी बँका घ्या, पाटबंधारे व ऊर्जा खातं घ्या! प्रचार असा करण्यात आला की औद्योगिकीकरण झपाट्याने व्हायला पाहिजे, त्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी राहिले पाहिजेत, त्यासाठी सरकार शेतकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देईल. त्यांनी जोमाने शेती करावी हा प्रचार होता, वस्तुस्थिती नाही!

नेहमी असं बोललं जातं की आता तर सरकार शेतकऱ्यांचंच आहे, शेतीला सर्व प्रकारचं उत्तेजन दिलं जातंय, इन्कम टॅक्स नसताना सुद्धा जे कर्ज झालंय ते माफ केलं जातंय. याचा अर्थ शेतकऱ्यांनी काही वेगळी आर्थिक मागणी करण्याची गरज नाही. शेतीला उत्तेजन देताना शेतकऱ्याचा काय विचार केला जातो? आपण असं समजून चालू हे जे शेतीला खरं-खोटं उत्तेजन आहे, त्यातून भरपूर पीक आलं तर शेतकरी सुखासमाधानात असतो. पण वस्तुस्थिती काय आहे? शेतीमध्ये भरपूर पीक आलं तर शेतकरीच सर्वांत जास्त हादरलेला असतो. शेतकरी दोन्ही वेळा हादरतो, दुष्काळाची शक्यता असते तेव्हा आणि भरपूर पीक आलं तरी! कारण शेतीचं भरपूर पीक औद्योगिक क्षेत्रासारखं येत नाही. औद्योगिक क्षेत्रात असं दिसतं की, एखाद्या कारखानदाराचं एखादं उत्पादन इतर सर्वांना मागे टाकून जातं. कारण त्यामध्ये स्पर्धा असू शकते. शेतीमध्ये त्या प्रकारची स्पर्धा असू शकत नाही. शेतीच्या दृष्टीने वर्ष चांगलं गेलं असेल तर सर्वांनाच उत्पादन चांगलं होतं आणि मग मालाचे भाव पडतात. उदा. कांद्याचं दुखणं पुन्हा पुन्हा येतं. म्हणजे, कांद्याचं वेळापत्रक काही वेळा बिघडतं आणि काही शहरांत कांद्याचे भाव वाढतात. पण त्या लोकांना असं कोणी सांगत नाही की तुम्ही कांदा खाऊ नका. पाचसहा आकडी पगार घेणारे लोकही कांद्याचे भाव वाढले म्हणून शेतकऱ्यांच्या नावाने आरडाओरडा करायला लागतात. त्या वेळी त्यांच्या मनात साधा विचार येत नाही की, ही कृत्रिम भाववाढ बाजारात मालच नसतो म्हणून असते. असं कधी नसतं की शेतकऱ्यांकडे भरपूर कांदे आहेत आणि त्यांनी संगनमत करून ते कांदे भाव वाढवू आणि विकू असं म्हणून बाजूला ठेवलेत. असं करता येणंच शक्य नाही. त्यात निसर्गाची मेख अशी आहे की कांदा हे गरिबांचं खाद्य म्हटलं जातं पण सर्वांत नखरेल पीक ते आहे. कांद्याला ऊन चालत नाही, थंडी चालत नाही आणि पाऊसही चालत नाही. क्षयरोग्याला जशी खेळती हवा लागते, तशी कांद्याची अवस्था असते. कांद्याइतकं शेतकऱ्याला छळणारं पीक दुसरं नाही. एके काळी देशाच्या सर्व भागांत कांदा होतही नसे. म्हणजे चाकण आणि लासलगाव या दोन बाजारपेठांचं महत्त्व वाढलं त्या काळात भारतात होणाऱ्या एकूण कांद्याच्या निम्म्यापेक्षा जास्त कांदा या दोन बाजारपेठांमध्ये येत असे. आता यात संशोधन वगैरे झाल्यामुळे इतर ठिकाणी कांदा येतो. या संशोधनातही एक विसंगती आहे, जे लोक नवीन जातीचं संशोधन करतात तेच लोक हायब्रीड जातीला चव वगैरे नसते असा समज पसरवतात.

त्यामुळे शेतीला उत्तेजन आहे म्हणजे शेतकऱ्याचं भलं होतं असं नाही. शेतीला जितकं जास्त उत्तेजन मिळेल तितक्या प्रमाणात शेतकऱ्याचा विचार एक माणूस म्हणून मर्यादित होत जाईल. मी शेतकरी संघटनेत भाषण करताना एक उदाहरण नेहमी द्यायचो, शेतकऱ्यांची अवस्था 'पाईपलाइन'सारखी आहे. इकडून तिकडे पाणी जातं, पण पाईपाला ते पाणी पिता येत नाही. तसं शेतीला उत्तेजन दिल्यामुळे जे काही धन इकडचं तिकडे जात असेल त्यातून शेतकऱ्याला काहीही मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. फक्त त्याचं जीवनमान निघतं, पण फक्त जीवनमानच निघायचं असेल तर, पाच हजार वर्षांपासून जे चालू आहे... म्हणजे पीक येईपर्यंत त्याचा सन्मान करायचा आणि पीक आल्यानंतर त्याला त्याची जागा दाखवून द्यायची, हेच चित्र - इतक्या सर्व स्वघोषित कृषिपुंगवांनी विद्वत्ता गाजवल्यानंतरही आहे. रामदासांचं एक वाक्य आहे, ''सारे निघाले करंटे, जो तो बुद्धीच सांगतो'' - अशी आजची अवस्था आहे!

आतापर्यंत काही भ्रम नोंदवले व त्यासंबंधीचे मला जाणवलेले वास्तवही मांडले. माझी खात्री आहे की प्रत्येक मुद्यावर माझ्या मांडणीच्या विरोधात आकडेवारी सादर केली जाईल - हे भ्रम पसरवणारी आकडेवारी गोळा करण्यासाठी फार मोठी सरकारी आणि सरकारधार्जिणी फौज जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर वावरत असते - गरिबीवर बोलून श्रीमंत होणारी मंडळी ती हीच! तथापि, काही भ्रम फक्त नोंदवून हा छोटा लेख (कारण हा विषय पुस्तकाचा आहे) पूर्ण करतो. भारतात बरीच जमीन अजून पडीक आहे, ती लागवडीखाली आणली पाहिजे हाही भ्रमच आहे. शेतकरी वर्गाच्या तळातल्या शेतकऱ्यांची परिस्थिती आधी सुधारली पाहिजे हा दुसरा; ग्रामीण भागात झपाट्याने औद्योगिकीकरण करण्यासाठी बिगर शेतकऱ्यांनी पुढे सरसावले पाहिजे हा तिसरा आणि परदेशी भांडवल आपल्या देशाकडे खेचण्यासाठी आखलेल्या 'सेझ'सारख्या योजना शेतकऱ्यांना देशोधडीला लावतील हा चौथा. माझे आतापर्यंतचे वास्तव आकलन ज्यांना कळले असेल त्यांना या चार भ्रमांचे (आणि इतरही अनेक भ्रमांचे) वास्तव आपसूकच कळेल.

पाचशे वर्षांपूर्वीपर्यंत शेतकरी आणि शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा होता - राजा आणि रयत हे दोनच वर्ग होते. रयत सुखी ठेवणारा राजा श्रेष्ठ मानला जात होता. गेल्या पाचशे वर्षांतच असे काय झाले की आता शेतकरी आणि शेती यांना अर्थव्यवस्थेवरच्या ओझ्याचे स्वरूप यावे?

(सदरील लेख सा. साधना दि. १८-२५ जून २०११ मधून साभार.)

**विनय हर्डीकर**
१७९१, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
vinay.freedom@gmail.com
मो. ९८९०१६६३२७(

**मधोमध**




**दत्ता जोशी**
media.care.abd@gmail.com


# आपण स्वत:ला नियंत्रित कधी करणार?

जूनच्या तिसऱ्या आठवड्यात डिझेलचे दर प्रतिलिटर तीन रुपयांनी आणि गॅस सिलिंडरचे दर ५० रुपयांनी वाढले. ही बातमी आल्यानंतर दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील २४ तासांच्या वृत्तगळतीला चांगलीच धार आली. सर्वसामान्यांचे जिणे कसे अवघड झाले आहे, त्यात महागाईने कसा कळस गाठला आहे आणि त्यात ही दरवाढ करून सरकारने जनतेला सर्वनाशाच्या खाईत लोटले आहे, असे या सर्व गदारोळाचे सार होते. राष्ट्रवादी काँग्रेसनेही या दरवाढीला विरोध करण्याचे सोपस्कार पार पाडून 'मी नाही त्यातली'चे दर्शन घडविले. भाजप आणि मित्रपक्षांनी नेहेमीप्रमाणे संतप्त प्रतिक्रिया नोंदविल्या, जणू काही हे लोक सत्तेवर येताच इंधनाचे दर अगदी कमी होतील ! एकूण साराच प्रकार अतिशय भाबडेपणाचा होता. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती घसरलेल्या असताना हे दर भारतात कसे वाढविण्यात आले, असाही दरवाढ विरोधकांचा आक्षेप आहे. वाढणारे हे दर सर्वांसाठीच त्रासदायक आहेत, हे मान्य केले, तरी दरवाढीच्या मुद्द्याची अपरिहार्यता आता लक्षात घेण्याची गरज आहे.

इंधनाचे साठे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत, हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. मागणी जास्त आणि पुरवठा कमी ही स्थिती संबंधित उत्पादनाचे दर वाढविण्यास पोषक असते हा व्यापाराचा अत्यंत सामान्य नियम आहे. खरेदी करण्यात येणारे कच्चे तेल व कच्च्या तेलावरील प्रक्रिया आणि यंत्रणांवरील खर्च हा आकडा जसाच्या तसा ग्राहकांकडून वसूल करावयाचा झाल्यास पेट्रोल, डिझेलचे दर १०० रुपयांच्या वर जातील आणि गॅस सिलेंडरचा दर ५५० रुपयांपेक्षा अधिक होईल. सरकार या सर्व उत्पादनांवर जे अनुदान देते त्यामुळे हे दर एवढे दिवस कमी होते. जागतिकीकरणाच्या रेट्यात हे दर वाढणार हे अटळ सत्य आहे. तोटा कमी करण्यासाठी सरकार दर हळूहळू वाढवत नेते आहे. याचा अर्थ



अनुदान हळू हळू कमी होते आहे. सरकार काँग्रेसचे आहे म्हणून हे होत आहे आणि उद्या आणखी कोणत्या पक्षाचे आले म्हणून सारे आलबेल होणार आहे, असे अजिबात नाही. आज या दरवाढीला टोकाचा विरोध करणाऱ्या सरकारलाही उद्या सत्तेवर येताच परत एकदा दरवाढ करावी लागणार आहे. त्यामुळे या प्रश्नाचा विचार पक्षीय दृष्टीकोनातून करता उपयोगाचे नाही.

एकीकडे 'इंधन वाचवा - देश वाचवा'च्या घोषणा चालू आहेत आणि दुसरीकडे वाहनांच्या बाजारात दररोज विक्रीला ऊत येतो आहे. पाच वर्षांपुर्वी बऱ्यापैकी मोकळे दिसणारे रस्ते आता वाहनांच्या गर्दीने ओसंडून वाहताना दिसत आहेत. दुचाकी वाहनांबरोबरच चारचाकी वाहनांची विक्रीही मागील पाच वर्षांत बेसुमार वाढली आहे. भौतिक गरजांच्या पूर्ततेसाठी हे सारे आवश्यक असले तरी देशाची गरज नेमकी काय आहे याचाही विचार झाला पाहिजे. घरातील पोर कॉलेजची पायरी चढते न चढते तोच त्याच्या हाती गाडी येते. कायद्यानुसार विचार केला, तर वयाची १८ वर्षे पूर्ण होण्याच्या आत मुलांच्या हाती वाहन देणे गुन्हा आहे. प्रत्यक्षात एकरावी - बारावीतील मुले-मुली भन्नाट वेगाने गाड्या उडवताना दिसतात. ही सारी 'बाळे' वेळच्यावेळी उत्तीर्ण झाली असे गृहित धरले तर अकरावीतील मुले १६ वर्षांची असतात ! यांना कोण रोखणार? गाडी चालविणे ही फॅशन आणि सायकल चालविणे ही लाजीरवाणी बाब ठरली, की अपरिहार्यपणे घरातील वाहनांची संख्या वाढत जाते. साहजिकच ताण येतो तो इंधन पुरवठ्यावर. चार चाकी वाहनांचेही तसेच आहे. अनेक जण आता फॅशन म्हणून चार चाकी वाहनांची खरेदी करीत आहेत. सव्वा लाखापासून दहा - बारा लाखांपर्यंतच्या गाड्या आता मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय कुटुंब हाताळते आहे.

वाहनउद्योग सरकारला मोठा महसूल मिळवून देतो हे खरे असले तरी राष्ट्रीय

**इंधन दरवाढीच्या विषयावर सर्वत्र बरीच कावकाव चालू आहे. दरवाढीवर टीका करणे ही तर आजची फॅशन बनली आहे. अशा संवेदनशील बाबींवर विचार करताना साधक - बाधक चर्चेची आवश्यकता असते. कोणत्याही विषयाचा सर्वांगीण आढावा घेताना त्यातील प्रत्येक मुद्द्याची कारणमीमांसा केली पाहिजे, अपरिहार्यता तपासल्या पाहिजेत. इंधन दरवाढ होणे ही आता अपरिहार्य बाब आहे. ती पक्षनिरपेक्ष आहे. या स्थितीत इंधनाचा सुयोग्य वापर करणे आणि पर्यायी इंधनाचा शोध घेणे हे दोनच पर्याय हातात आहेत. खरी गरज या पर्यायांवर विचार करण्याची आणि आपण स्वतःला नियंत्रित करण्याची आहे.**



हितासमोर या सर्व बाबींवर काही नियंत्रणे आणणे आता आवश्यक वाटते. आकर्षक स्किम्स आणि सोपी कर्जव्यवस्था यामुळे वाहन खरेदी सोपी झाली आहे. वाहनांची नवनवी मॉडेल्स आणि आकर्षक जाहिराती यांमुळे खरेदीचा भरही वाढत आहे. वितरकांना तर नेहेमीच टार्गेट्स पूर्ण करायची असतात. त्यामुळे ते तर गाड्या विकणारच. या स्थितीत देशाचा विचार कोण करणार? या दृष्टीने धोरण कोण आखणार? दूरदृष्टीने धोरण आखण्याच्या बाबतीत भारत नेहेमीच पिछाडीवर दिसतो. इथे प्रत्येक चांगल्या कामासाठी जनतेलाच आंदोलन पुकारावे लागते. चांगले शिक्षण हवे? - आंदोलन करा. ब्रॉडगेज हवे? - आंदोलन करा. परदेशी कंपन्यांमुळे देशाचे नुकसान होते आहे? - आंदोलन करा. सारे काही आंदोलन करूनच मिळवायचे असेल तर सरकार काय करते आहे? भविष्याचा वेध घेऊन सुनिश्चित धोरण ठरवता का येऊ नये? इंधनाचा प्रश्न ऐरणीवर येत असताना वाहनांच्या संख्येवर नियंत्रणाचा विचार का केला जाऊ नये?

मुक्त अर्थव्यवस्थेत अशी नियंत्रणे अशक्य असतात, जागतिक दबाव असतो हे सारे युक्तिवाद मान्य केले तर मग पर्यायी इंधन व्यवस्थेसाठी सरकारने कोणती पावले उचलली आहेत? देशात मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या सौरऊजेचा वापर वाहनांसाठी करण्याचा विचार मागे गांभीर्याने झाला. पण त्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्याकडे कोणी लक्ष दिलेले नाही. प्रत्येक गोष्टींसाठी आपण परदेशी संशोधनांवरच अवलंबून राहणार का? पेट्रोलचा शोध परदेशात लागला, मग आपण ते तंत्रज्ञान आणले. पर्यायी इंधन आपली गरज आहे. ज्या देशात असे शोध लागतात तेथे सूर्यप्रकाश मर्यादित असतो म्हणून ते देश सौरऊर्जेवर जास्त लक्ष देत नाहीत. आपल्याकडे तो स्रोत मुबलक आहे तर आपण त्यावर लक्ष केंद्रित का करीत नाहीत ? अशा गोष्टी सरकारने पुढाकार घेऊन केल्या पाहिजेत. पंढरपूर तालुक्यातील मेंढापूरच्या राजेंद्र पवार या तरुणाने 'झिंक ऑक्साईडचे अतिसूक्ष्म कणांत रुपांतर करून त्याचा सौर घट तयार करण्यासाठी वापर' या विषयात संशोधन केले आहे. दक्षिण कोरियातील हनिहंग विद्यापीठाने त्याला शिष्यवृत्ती देऊन आपल्या देशात बोलावले आहे. सौरऊर्जेचा वाहनांतील वापर करण्याबाबत दोन प्रमुख अडचणी सांगितल्या जातात. एक तर 'सोलार पॅनल'चा आकार भला मोठा असतो आणि दुसरे म्हणजे सौरऊर्जा साठविणाऱ्या विद्युत घटांची (बॅटरी) मर्यादित क्षमता आणि त्याचे जेमतेम ३ ते ४ वर्षांचे मर्यादित आयुष्य. या दोन्ही प्रश्नांतून मार्ग काढणे राजेंद्र पवारच्या संशोधनातून शक्य आहे का? आपल्या देशातील तरुणांची ही क्षमता आहे, पण या क्षमतेचा व्यवहारात उपयोग करून घेण्याची ही अक्कल आमच्या सरकारला कधी येणार? अशाच प्रकारे अंबाजोगाईच्या वैभव तिडके या तरुणाने सौर ऊर्जेच्या वापराद्वारे धान्य वाळविण्याच्या यंत्राची निर्मिती केली आहे. त्याच्या ज्ञानाचा उपयोग सौरऊर्जाविषयक उपक्रमांमध्ये करून घेणे शक्य नाही का? विजेवर चालणारी काही दुचाकी वाहने मध्यंतरी बाजारपेठेत येऊन गेली, पण त्यांना फारसा प्रतिसाद लाभला नाही. इथेही प्रश्न आला तो बॅटरीच्या आयुष्यमानाचा !

असाच मुद्दा इथेनॉलचा. इथेनॉलचा इंधनातील वापर ५ टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत नेला तर एकीकडे इंधनाचे दर कमी करता येतील आणि दुसरीकडे परकीय चलनही वाचेल. या बाबतीत सरकारने नेहेमीच धरसोडीची भूमिका घेतली आहे. काही हितसंबंधितांच्या कारखान्यांना इथेनॉल

**भाव वाढल्याने कांद्याची खरेदी करणारी जनता याच कारणामुळे इंधनाची खरेदी कमी का करीत नाही? घरातील प्रत्येकाला स्वयंचलित वाहनच का लागते? विद्यार्थी सायकलचा वापर का करीत नाहीत? पाकिस्तानविरुद्धच्या युद्धाच्या वेळी शास्त्रीजींनी प्रत्येकाला दररोज एक मुठ तांदुळ वाचविण्याचे आवाहन केले होते. आज वेगळ्या परिस्थितीत दररोज प्रत्येकाने १०० मिलीलीटर इंधन वाचविले, तरी या विषयात किती फरक पडेल, याची आकडेवारी संख्यातज्ज्ञांनी अवश्य काढून पाहावी.**






निर्मितीची परवानगी मिळाली. इतरांना नाकारण्यात आली. त्यातीह प्रमाण ठरवून देण्यात आले. आज साखर कारखान्यांच्या ऊस गाळपाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या स्थितीत जादा उसाचा प्रश्न निकालात निघाला असता, कारकान्यांना वाढीव उत्पन्न मिळाले असते, शेतकऱ्यांना वाढीव भाव मिळाला असता आणि इंधनाचा दरही कमी करणे शक्य झाले असते. पण लक्षात कोण घेतो?

वैयक्तिक वाहनांचा वापर वाढला, की इंधनाची गरजही वाढते. अनेक पाश्चात्य देशांमध्ये सार्वजनिक वाहन व्यवस्था इतकी सोयीची आणि स्वस्त आहे, की लोक खाजगी वाहनांचा विचारही करीत नाहीत. त्यातही, खाजगी वाहनांवील करही काही ठिकाणी एवढे वाढवून ठेवले आहेत की अशा वाहनांऐवजी सोयीस्कर ठरणाऱ्या सार्वजनिक वाहनसेवेने प्रवास करणे तो पसंत करतो. भारतात या विषयात आनंदीआनंद आहे. सार्वजनिक वाहतुक सेवेची अवस्था अत्यंत असमाधानकारक आहे. शहरांतर्गत सेवेत तर इतके विरोधाभास आहेत, की विचारता सोय नाही. या स्थितीत वैयक्तिक वाहनांची पसंती वाढते आणि इंधनाची मागणी आपोआपच वाढते.

स्वतः शासन हेच इंधनाचे सर्वात मोठे ग्राहक आहे. शासकीय वाहनांना दरमहा लागणारे इंधन किती, याचा शोध घेण्याची गरज आहे. अधिकारीवर्ग आपल्याला हवा तसा शासकीय वाहनांचा वापर करतो. या बेजबाबदारीतून इंधनाचा बोजा वाढत जातो. विविध ठिकाणी होत असलेल्या खाजगीकरणामुळे काही नवे पैलू समोर येत आहेत. औरंगाबादेत नुकताच 'जीटीएल'कडे विजेच्या वितरणाचा कारभार सोपविण्यात आला. या कंपनीने अधिकाऱ्यांच्या वाहनखर्चात एक चांगली युक्ती वापरली. अधिकाऱ्यांनी आपापली चारचाकी वाहने वापरावीत, अशा वाहनांच्या इंधनखर्चापोटी काही विशिष्ट रक्कम कंपनीने त्यांना द्यावी, असा तो मार्ग. या एकाच बाणात किती पक्षी मारले गेले? वाहनांवर करावी लागणारी कंपनीची गुंतवणूक वाचली, वाहनांचा घसारा मोजण्याची गरज उरली नाही आणि अधिकाऱ्यांच्या हालचालींना विशिष्ट मर्यादा आली. करावी लागणारी कामे तर चुकणार नाहीत आणि अनावस्यक वापरही नक्कीच टळणार...! असाच निर्णय औरंगाबाद महापालिकेने घेतला होता. अशा प्रकारचे प्रयोग सर्वत्र झाले तर इंधनाबरोबरच इतर खर्चांचीही बचत नक्कीच होईल.

शेवटी एक महत्वाचा मुद्दा मला मांडायचा आहे. हा थेट ग्राहकाशी संबंधित आहे. बाजारपेठेत सर्वच वस्तूंचे दर वाढत आहेत. पण जीवनावश्यक वस्तूंची खरेदी थांबलेली नाही. गहू,ज्वारी, तांदुळ प्रत्येक जण लागेल तेवढा खरेदी करतोच आहे. मात्र या धान्याचा वापर आता अधिक काळजीपूर्वक होतो आहे. मध्यंतरी कांद्याचे भाव गगनाला भिडले. या काळात कांद्याचा वापर बंद झाला का? साठ रुपये किलोने मिळणारा कांदा ग्राहकांनी अतिशय मर्यादित प्रमाणात खरेदी केला. भाव वाढल्याने कांद्याची खरेदी करणारी जनता याच कारणामुळे इंधनाची खरेदी कमी का करीत नाही? घरातील प्रत्येकाला स्वयंचलित वाहनच का लागते? विद्यार्थी सायकलचा वापर का करीत नाहीत? पाकिस्तानविरुद्धच्या युद्धाच्या वेळी शास्त्रीजींनी प्रत्येकाला दररोज एक मुठ तांदुळ वाचविण्याचे आवाहन केले होते. आज वेगळ्या परिस्थितीत दररोज प्रत्येकाने १०० मिलीलीटर इंधन वाचविले, तरी या विषयात किती फरक पडेल, याची आकडेवारी संख्यातज्ज्ञांनी अवश्य काढून पाहावी. इंधनाचा दर महिन्याचा कोटा आपण का ठरवून घेऊ शकत नाहीत? किती लिटर पेट्रोल जाळायचे हे ठरविण्याऐवजी किती रुपयांचे पेट्रोल जाळायचे, हे ठरविले तरी वापरावर नियंत्रण आपोआपच येईल. कोपऱ्यावरील दुकानातून किलोभर साखर आणायची तरी गाडीला किक् मारली जाते. याची खरेच गरज आहे?

या प्रश्नाला असंख्य पैलू आहेत. सरकारी पैलूमध्ये फारसा बदल होणार नाही. या किमती सातत्याने वाढतच जाणार आहेत. सध्या सरकारचे नियंत्रण आहे म्हणून या किमती आटोक्यात आहेत. ही नियंत्रणे आणि अनुदाने काढली तर या किमती वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रचंड प्रमाणात वाढणार आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली, तर आपल्या हातात असलेले उपाय अत्यंत मर्यादित आहेत याची जाणीव आपल्याला होते. या उपायांचा वापर करून जीवन सुखकर करायचे की सरकारला दोष देत मनस्वास्थ्य बिघडू द्यायचे, याचा निर्णय आपणच करायचा आहे.

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# भाजपची दिवाळी की दिवाळे?



**वाजपेयींचा अपवाद वगळता भाजपचे सगळे नेतृत्व संघप्रकाशित राहिले आहे. काही प्रमाणात भाजपातील मागासवर्गीय नेते संघ प्रभावाशिवाय स्वत:च्या ताकदीवर जनाधार निर्माण करण्यात यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत; पण भाजपमध्ये जनाधारित नेतृत्व आणि संघाधारित नेतृत्व यांच्यात नेहमीच संघर्ष होत आला आहे. अगदी वाजपेयींच्या वेळीसुद्धा सुप्त स्वरूपात का होईना असा संघर्ष झाला आहे. आज गाजत असलेले मुंडे प्रकरण म्हणजे या संघर्षाचे उग्र रूप आहे. संघ संस्कृती आणि पक्ष म्हणून भाजपचे नेतृत्व मागासवर्गीय व वर्णीय यांना स्वत:सोबत घेण्यास, स्वत:च्या बरोबरीचा दर्जा देण्यास पुरेसे तयार नसल्याचेच हा संघर्ष दर्शवितो.**

दिल्लीच्या रामलीला मैदानावर रामदेवबाबांचे आंदोलन मोडून काढण्यासाठी सरकारच्या आदेशावरून पोलिसांनी जे रानटी वर्तन केले त्याचा धिक्कार काँग्रेस पक्षाचे सरकार वगळता सामान्य नागरिकांपासून ते विशिष्टजणांपर्यंत आणि डाव्या पक्षापासून ते उजव्या पक्षापर्यंत सर्वांनीच केले.

भारतीय जनता पक्ष हा प्रमुख विरोधी पक्ष असल्याने त्याने सरकारचा धिक्कार करण्यात आघाडीवर राहणे क्रमप्राप्तच होते. काही न करता सवरता केंद्र सरकारने बाबा रामदेव यांच्या आंदोलनाचे श्रेय भारतीय जनता पक्षाला दिल्याने तर या पक्षाचा विरोधाचा उत्साह द्विगुणीत झाला होता. या उत्साहातच भाजपने राजघाटवर म. गांधींच्या समाधीजवळ रामलीला मैदानावरील पोलिसी अत्याचाराच्या विरोधात उपोषण केले. पक्षाचे सारे केंद्रीय नेतृत्व या उपोषणात सामील झाले होते. भ्रष्टाचाराची मोठमोठी प्रकरणे बाहेर आल्याने बदनाम झालेल्या केंद्र सरकार विरोधात असंतोष वाढत असतानाच भ्रष्टाचारविरोधी आंदोलन मोडून काढण्याचा आततायीपणा केंद्र सरकारने केल्याने त्याचा राजकीय लाभ आपल्याला मिळणार याची खात्री भाजपला झाल्याने पक्षाच्या विरोध आंदोलनात दांडगा उत्साह असणे स्वाभाविकच होते. लोकसभेतील विरोधीपक्ष नेत्या श्रीमती सुषमा स्वराज यांच्या पुढाकाराने राजघाटवर नाचगाण्याचा जो कार्यक्रम रंगला आणि मैदानावरील दु:खद घटनेचा जो अवर्णनीय आनंद प्रत्येक नेत्याच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता त्या मागे याच राजकीय लाभाचे गणित होते. आता सत्ता आपल्यापासून दूर नाही या कल्पनेनेच निवडणुका दूर असतानाही दिवाळी साजरी करण्याचा मोह भाजप नेतृत्वाला आवरता आला नाही हे राजघाटच्या घटनेवरून दिसून आले; पण खरेच भाजपने दिवाळी साजरी करावी अशी परिस्थिती आहे का?



सुधाकर जाधव

केंद्रात वाजपेयी सरकारच्या ५ वर्षांच्या कारकिर्दीनंतर भाजपला असाच भ्रम झाला होता. इंडिया शायनिंगचा नारा देऊन सत्ता हाती येणारच या भ्रमात वावरत हा पक्ष निवडणुकीला सामोरा जाऊन तोंडघशी पडला होता. स्वतंत्र भारताच्या इतिहासात काँग्रेसेतर पक्षांनी एकाच पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याच्या अपूर्व घटनेनंतरच्या त्या निवडणुका होत्या. काँग्रेसेतर पक्षांना राज्य करता येत नाही ही दृढ झालेली समजूत पुसून टाकण्यात वाजपेयी यांचे सरकार यशस्वी झाले होते. पूर्वीच्या काँग्रेस सरकारने सुरू केलेले उदारीकरणाचे धोरण वाजपेयी सरकारने पुढे रेटण्यात यश मिळविले होते. गुजरात राज्यातील भीषण व क्रूर जातीय दंगल व त्या दंगलीतील मोदी सरकारच्या सहभागाचा कलंक वगळता सर्वत्र आबादीआबाद असल्याचे चित्र उभे करून भाजप निवडणुकीला सामोरा गेला होता. वाजपेयींसारखे सक्षम व लोकप्रिय नेतृत्व होते.

अशा संपूर्ण अनुकूल असलेल्या वातावरणात प्रतिकूल निकालाला या पक्षाला सामोरे जावे लागले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे. या पक्षाजवळ जनमानसावर प्रभाव असणारे एकमेव नेतृत्व वाजपेयींचे होते. अडवाणी यांचा प्रभाव कार्यकर्त्यांपुरताच मर्यादित राहिला आहे. जनतेत प्रभाव असलेले नेतृत्व नसले की पक्ष कसा तेजोहीन व मरगळलेला बनतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतीय जनता पक्ष आहे. याच कारणाने केंद्रातील सरकारने अनंत चुका व अनंत अपराध करूनही सरकारविरुद्ध वातावरण निर्माण करण्यात, आंदोलन उभे करण्यात हा पक्ष संपूर्णपणे अपयशी ठरला आहे. तरीही बाबा आणि अण्णा यांनी आपल्या आंदोलनातून सरकार विरोधी निर्माण केलेलं वातावरण किंवा ही आंदोलने हाताळताना सरकारने केलेल्या चुका या भरवशावर भाजपचे सत्ताप्राप्तीचे स्वप्नरंजन सुरू आहे. राजघाटवर याच स्वप्नरंजनातून भाजप नेत्यांनी दिवाळी साजरी करून आपल्या दिवाळखोरीचे प्रदर्शन तेवढे केले!

भाजपमुळे पोकळी

भारतीय जनता पक्ष हा प्रमुख विरोधी पक्षाच्या स्थानावर विराजमान आहे. विरोधी पक्षाला काम करण्यासाठी, जनतेत जाऊन त्यांना संघटित करण्यासाठी, जनसंघर्ष उभा करण्यासाठी सध्याचा काळ हा सर्वाधिक अनुकूल काळ आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्वाधिक अक्षम, निष्क्रिय आणि भ्रष्ट म्हणता येईल असे सरकार केंद्रात आहे; पण अशा सरकारविरुद्ध आवाज बुलंद करण्यात भाजप सपशेल अपयशी ठरला आहे. जे काम आधीच प्रमुख विरोधी पक्ष म्हणून भाजपने करायला हवे होते ते करू न शकल्याने बाबा-अण्णा यांचा उदय झाला. अण्णा आणि बाबा यांच्या आंदोलनाच्या आधी सर्वोच्च न्यायालयाला विरोधी पक्षाची

**बाबांचे आंदोलन आरएसएसच्या पाठिंब्याने उभे राहिले आहे. नव्हे हे संघाचेच आंदोलन आहे असे मानून चालू; पण संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करू नये असा काही नियम आहे का? संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करणे घटनाविरोधी आहे का? संघाचा धर्मवाद राष्ट्रीय एकात्मतेसाठी घातक आहे यात शंकाच नाही.आणि बाबा रामदेव यांच्या व्यासपीठावरून जर धार्मिक द्वेष फैलावण्याचा थोडा जरी प्रयत्न झाला असेल तर या पेक्षाही अधिक कठोर कारवाई करणे नक्कीच समर्थनीय ठरले असते; पण असे काही झाल्याचा गृहमंत्री आरोप करीत नाहीत. त्यांचा आरोप फक्त आरएसएसचा या आंदोलनात हात असल्याचा आहे.**

भूमिका निभवावी लागली होती आणि आजही निभावावी लागत आहे. प्रमुख विरोधी पक्षाला सरकार वर अंकुश ठेवण्यात अपयश आल्याने सरकार व न्यायसंस्था एकमेकांच्या विरोधात उभ्या ठाकल्याचे चित्र निर्माण झाले आहे. असे चित्र लोकशाहीसाठी घातक आहे. सक्षम सरकार व सजग नि सक्रीय विरोधी पक्ष हे चांगल्या राजकीय व्यवस्थेसाठी आणि सुशासन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतात; पण गेल्या दोन वर्षांत प्रथमच अक्षम सरकार व निष्क्रिय विरोधी पक्ष यांच्या जात्यात देशभरातील जनता भरडली जात आहे. यातून देशातील राजकीय व्यवस्था व लोकशाही संस्थांबाबत भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे, असे प्रश्नचिन्ह उभे करण्यात सरकार इतकाच विरोधी पक्ष म्हणून भाजपसुद्धा दोषी आहे. सरकारच्या निष्क्रियतेचे व भाजपच्या अकर्मण्यतेचे परिणाम आज देश भोगतो आहे. भाजपचे नेतृत्व परिस्थितीचा उपयोग करून घेण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. यातून नेतृत्वाचा खुजेपणा स्पष्ट झाला आहे.

संघाचे नेतृत्व

संघ व भाजप यांचे संबंध जगजाहीर आहेत. भाजपला या संबंधांचा अभिमान आहे आणि पक्षाचे नेते तसे संधी मिळेल तेव्हा जाहीर करीत असतात. संघ मात्र हे संबंध कधीच खुलेपणाने मान्य करीत नाही. इतक्या वर्षांत या पक्षाबाबत एकच गोष्ट संघाने आडपडदा न ठेवता केली. ती म्हणजे गडकरी यांना अध्यक्ष म्हणून भाजपवर थोपविले! वास्तविक गडकरी हे भाजपच्या नेतृत्वाच्या रांगेत बरेच मागे होते. मंत्री म्हणून गडकरींची कार्यक्षमता व प्रशासनावरील पकड सिद्ध झाली आहे; पण मंत्रालयात एखाद्या खात्याचा कारभार पाहणे आणि पक्ष चालविणे यात महदअंतर आहे. पक्षासाठी प्रशासनावरील नाही तर लोकांवरील पकड महत्त्वाची असते. गडकरी यांची तशी पकड कधी महाराष्ट्रात नव्हती, तर देशपातळीवर असण्याचा प्रश्नच नव्हता; पण संघाने पुढे केलेला चेहरा असल्याने अध्यक्ष म्हणून त्यांना विरोध करण्याची कोणाची हिंमत नव्हती. कारण वाजपेयींचा अपवाद वगळता भाजपचे सगळे नेतृत्व संघप्रकाशित राहिले आहे. काही प्रमाणात भाजपातील मागासवर्गीय नेते संघ



प्रभावाशिवाय स्वतःच्या ताकदीवर जनाधार निर्माण करण्यात यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत; पण भाजपमध्ये जनाधारित नेतृत्व आणि संघाधारित नेतृत्व यांच्यात नेहमीच संघर्ष होत आला आहे. अगदी वाजपेयींच्या वेळीसुद्धा सुप्त स्वरूपात का होईना असा संघर्ष झाला आहे. आज गाजत असलेले मुंडे प्रकरण म्हणजे या संघर्षाचे उग्र रूप आहे. संघसंस्कृती आणि पक्ष म्हणून भाजपचे नेतृत्व मागासवर्गीय व वर्णीय यांना स्वतःसोबत घेण्यास, स्वतःच्या बरोबरीचा दर्जा देण्यास पुरेसे तयार नसल्याचेच हा संघर्ष दर्शवितो. परिस्थिती अनुकूल असतानाही भाजप सत्तेच्याजवळ येण्याऐवजी दिवसेंदिवस सत्तेच्या दूर जाण्यामागे बऱ्याच अंशी हा संघर्ष कारणीभूत आहे. आज दिसत असलेला गडकरी-मुंडे संघर्ष हा जितका दोन व्यक्तींमधील आहे, त्यापेक्षा जास्त संघाधारित नेतृत्व व जनाधारित नेतृत्व यांच्यातील तो संघर्ष आहे. यापूर्वीही शंकरलाल वाघेला, कल्याणसिंह आणि उमा भारती यांच्या बाबतीत असा संघर्ष झडला आहे. या तिघांनाही बाहेर पडावे लागले होते. हे तिघेही भाजपला आव्हान देण्यात असमर्थ ठरले असले तरी या संघर्षाने भाजप पक्ष कमजोर झाला हे सत्य आहे. या तीन मागासवर्गीय नेत्यांपेक्षा मुंडेंची स्थिती वेगळी असल्याने गडकरी-मुंडे संघर्ष भाजपच्या सत्ताप्राप्तीच्या उद्दीष्टांतील मोठा अडथळा ठरण्याची शक्यता अधिक आहे. बाहेर पडून भाजपात परतलेले कल्याणसिंह किंवा उमा भारती आणि गोपीनाथ मुंडे यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहे. कल्याणसिंह व उमा भारती यांनी भाजपाला मागासवर्गीय चेहरा दिला, पण गोपीनाथ मुंडे यानी असा चेहरा देण्यासोबतच पक्षाची बांधणी संघाधारित न ठेवता मागासवर्गीय आधारित केली. मागासवर्गियांचे नेतृत्व पक्षाला दिले. आता मुंडेंना शह द्यायचा असेल तर तो संघाकडून देता येणारच नाही, मुंडेंनी उभे केलेले नेतृत्वच प्यादे म्हणून पुढे करावे लागणार आहे आणि महाराष्ट्रात नेमके असेच घडताना दिसत आहे. या खेळीने मुंडे बाहेर जातीलही; पण नव्या मागासवर्गीय नेतृत्वापासून सुटका करून घेण्यासाठी पुन्हा संघर्ष उभा राहील. पक्ष म्हणून उभे राहायचे असेल व शक्तीशाली पर्याय म्हणून सत्तेच्या स्पर्धेत उतरायचे असेल तर मागासवर्गीय नेतृत्वाला पक्षात मान आणि स्थान द्यावे लागेल; पण असे स्थान दिले की, हिंदुत्वाचा मुद्दा बाजुला पडतो. नेमके हेच संघाला नको आहे. एकीकडे भाजप नेतृत्वाची सत्ताकांक्षा वाढते आहे तर दुसरीकडे सत्ता मिळाली नाही तरी चालेल पण हिंदुत्वाचा मुद्दा सोडणे तर दूरच पण सौम्यदेखील होता कामा नये हा संघाचा आग्रह आहे. भाजपची हीच दोलायमान अवस्था त्याला निष्क्रिय बनवून सत्तेपासून दूर नेत आहे.

### संघापासून फारकत गरजेची

जोपर्यंत संघ व भाजप यांची नाळ तूटत नाही तोपर्यंत भाजपचे समर्थ पर्यायी पक्ष बनण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहणार आहे. संघाधारित नेतृत्व व मागासवर्गीय नेतृत्व यांच्यातील संघर्ष संपविण्याचा हा मार्ग आहे; पण फक्त संघटन पातळीवर नाळ तुटून उपयोग नाही. वाजपेयी सरकारने आपला पहिला कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण करूनही त्यांना पराभव पत्करावा लागला याची नीट कारणमीमांसा केली तर विचारांची नाळदेखील तोडण्याची गरज स्पष्ट होते. वाजपेयींना सर्व बाबी अनुकूल होत्या शिवाय गुजरात राज्यातील दंगलीतून घडलेल्या नरसंहाराच्या मोदी सरकारच्या यातील सहभाग हा संघाच्या वैचारिक वारशाचा परिणाम आहे. याबद्दल संघाला आणि भाजपतील संघीय नेतृत्वाला मोदींचा अभिमान वाटणे स्वाभाविक असले तरी याच कारणाने केंद्रातील सत्तेत परतण्याचा भाजपचा मार्ग बंद झाला आहे हे लक्षात घेतले तर संघापासून फारकत घेण्याची निकड लक्षात येईल; पण यासाठी संघाधारित नेतृत्वाकडून जनाधारित नेतृत्वाकडे भाजपची सूत्रे आली पाहिजेत. संघ नियुक्त भाजप अध्यक्ष नितीन गडकरी यांच्या राजिनाम्याने भाजपांतर्गत सत्तांतराला प्रारंभ होऊ शकतो. हीच भाजपसाठी खरी दिवाळी असेल. असे पक्षांतर्गत सत्तांतर झाल्याशिवाय देशाची सत्ता मिळविणे हे स्वप्नरंजन ठरणार आहे. राजकीय पक्ष दीर्घकाळ सत्तेपासून दूर राहिला तर तो दिवाळखोर बनणे अपरिहार्य असते. भाजप आज अशाच दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# आता गरज पाचव्या स्तंभाची


**या प्रचलित अर्थव्यवस्थेचे खेळच न्यारे आहेत. रासायनिक खतांच्या सबसिडीच्या नावाखाली कंपन्या आणि संबंधित शासक-प्रशासकांचे उखळ पांढरे होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या नावाखाली बँकांची कधीच वसूली होऊ शकणार नव्हती अशी बुडीत निघालेली कर्जे वसूल होतात. शेतीविषयक वेगवेगळ्या अनुदानावर राजकारणी डल्ला मारून जातात. नाव शेतकऱ्यांचे आणि चंगळ करतात इतरच! शेतकऱ्याची ओंजळ रिकामीच्या रिकामीच राहते.**

**हे खरे आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळातही शेतकऱ्याला काहीच मिळत नव्हते; पण शेतकऱ्यांचे नाव घेऊन हजारो कोटी रुपये शासकीय तिजोरीतून उकलून त्यावर अवांतर बांडगुळे नक्कीच पोसली जात नव्हती. स्वातंत्र्य असो की पारतंत्र्य, राजेशाही असो की लोकशाही, व्यवस्था कोणतीही असो शेतकरी उपेक्षितच राहिला आहे. स्वातंत्र्य मिळूनही आणि लोकशाही शासनव्यवस्था येऊनही शेतकरी दुर्लक्षितच का राहिला, याची काही कारणे आहेत.**

सन २००९ मध्ये केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांसाठी सुमारे हजार ७० कोटीची कर्जमाफी जाहीर केली तेव्हा बुद्धिजीवी अर्थतज्ज्ञांनी एकच गलका केला होता. त्यांच्या मतानुसार ७० हजार कोटी एवढी प्रचंड रक्कम शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात घालवली तर हा देश बुडणार होता. दोन वर्षांपेक्षा जास्त काळ उलटला पण अजून देश काही बुडला नाही. समुद्राच्या पाण्याखाली दक्षिण भारताचा काही भाग बुडण्याची शक्यता निर्माण झाली होती; पण ती त्सुनामीमुळे; कर्जमाफीमुळे नाही. बुद्धिप्रामाण्यवादी अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार ७० हजार कोटी एवढी प्रचंड रक्कम शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात घालवली तर या देशाची अर्थव्यवस्था कोलमडणार होती किंवा कोसळणार होती, नाहीतर ढासळणार तर नक्कीच होती; पण अर्थव्यवस्था कोसळून त्याखाली गुदमरून काही जीवितहानी किंवा कोणी दगावल्याची खबर निदान माझ्यापर्यंत तरी अजून पोचलेली नाही.

खरं तर एकदा काहीतरी कोसळायलाच हवे. काहीच कोसळायला तयार नसेल तर निदान अर्थव्यवस्था तरी कोसळायला हवी आणि त्या ओझ्याखाली दबून व चेंगरून या देशातले भ्रष्टाचारी शासनकर्ते, संवेदनाहीन प्रशासनकर्ते व त्यांचे सल्लागार अर्थतज्ज्ञ नियोजनकर्ते नाहीच दगावले तरी हरकत नाही; पण निदान काही काळ तरी यांचे श्वास नक्कीच गुदमरायला हवे, असे आता मला मनोमन वाटायला लागले आहे. कारण अर्थव्यवस्था बळकट असल्याचा नियोजनकर्त्यांनी कितीही आव आणला तरी आवश्यक त्या बिंदूवर ही अर्थव्यवस्था अत्यंत दुर्बल आहे, याची आता माझ्यासारख्या अर्थशास्त्र विषयाचा लवलेशही नसलेल्यांना खात्री पटू लागली आहे. देशाच्या आरोग्याच्या सुदृढ आणि निकोप वाढीसाठी ही अर्थव्यवस्था कुचकामी व अत्यंत निरुपयोगी आहे. सर्वांना मोफत शिक्षण पुरविण्याची, सर्वांना आरोग्य पुरविण्याची, बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्याची, हाताला काम मिळण्यासाठी नवनवे पर्याय उपलब्ध करून देण्याची, दारिद्र्यरेषेखालील जनतेला दारिद्र्यरेषेच्यावर आणण्याची, शेतीची दुर्दशा घालविण्याची या अर्थव्यवस्थेत अजिबात इच्छाशक्ती उरलेली नाही. यापैकी एकही प्रश्न मार्गी लावायचा म्हटले तर त्यासाठी या अर्थव्यवस्थेच्या तिजोरीत ठणठणाट आहे आणि तसा प्रयत्न करायची भाषा केल्याबरोबरच अर्थव्यवस्था कोसळायची भीती उत्पन्न व्हायला लागते, हेही नित्याचेच झाले आहे.

मात्र ही अर्थव्यवस्था नको तिथे आणि चुकीच्या बिंदूवर अत्यंत बळकट आहे. शासनाचे आणि प्रशासनाचे ऐषोआराम पूर्ण करायचे म्हटले की ही अर्थव्यवस्था अत्यंत दणकट वाटायला लागते.



गंगाधर मुटे

आमदार-खासदार-मंत्र्यांची पगारवाढ किंवा भत्तेवाढ करताना किंवा सहावा-सातवा-आठवा वेतन आयोग लागू करताना अर्थव्यवस्था कोसळायचे बुजगावणेही कधीच उभे केले जात नाही आणि ते खरेही आहे कारण अर्थव्यवस्था बळकट केवळ याच बिंदूवर आहे. शिवाय सरकारी तिजोरीच्या चाब्याही नेमक्या अर्थव्यवस्थेच्या याच बळकट बिंदूवर ज्यांची वर्दळ आहे, त्यांच्याच हातात आहे. त्यामुळे साहजिकच आर्थिक भ्रष्टाचाराच्या गंगोत्रीचा उगमही याच बिंदूपासून होतो, हे समजून घेणे

गरजेचे आहे. बहुतांश बुद्धिजीवी, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, शासक आणि प्रशासक हे या गंगोत्रीचे लाभधारक असल्याने ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत असतात. यांचे चालणे, बोलणे, वागणे आणि लिहिणे प्रस्थापित व्यवस्थेला पूरक असेच असते. यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे असतात. त्यामुळे सत्य कधीच बाहेर येत नाही. याचा अर्थ एवढाच की शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ७० हजार करोड खर्च केल्याने देश बुडला नाही, अर्थव्यवस्था कोसळली नाही किंवा याच कारणामुळे महागाईही वाढली नाही. पण खरेखुरे वास्तव जाणिवपूर्वक दडवून ठेवले जाते.

स्वातंत्र्यानंतरच्या संपूर्ण काळात केंद्रशासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी खर्च केलेल्या रकमांची एकत्रित बेरीज केली आणि या रकमेला शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येच्या संख्येने भागीतले तर ही रक्कम काही केल्या दरडोई हजार-दीड हजार रुपयांच्यावर जात नाही. याचा स्पष्ट अर्थ एवढाच होतो, की स्वातंत्र्यानंतरच्या प्रदीर्घ काळात शेतकऱ्यांना कर्जमाफ म्हणून केवळ दरडोई हजार-दीड हजार रुपयेच मिळालेत. मग प्रश्न उरतो हजार-दीड हजार रुपयांचे मोल किती? ही रक्कम आमदार, खासदार यांच्या एका दिवसाच्या दरडोई भत्त्यापेक्षा कमी आहे. प्रथमश्रेणी कर्मचाऱ्याच्या एका दिवसाच्या दरडोई पगारापेक्षा कमी आहे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याच्या दरडोई दिवाळी बोनसपेक्षा कमी आहे आणि महत्त्वाचे म्हणजे वाममार्गाने सरकारी तिजोरीतून पैसे उकळून एक मंत्री दोन तासामध्ये पिण्यासाठी जेवढी रक्कम खर्च करतो, त्यापेक्षा तर फारच कमी आहे. म्हणजे दरडोई मंत्र्याच्या पिण्यावर दोन तासांसाठी सरकारी तिजोरीतून जेवढा खर्च होतो, त्यापेक्षाही कमी दरडोई खर्च शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी गेल्या साठ वर्षांतही झालेला नाही; पण हे कोणी विचारात घ्यायलाच तयार नाही.

शेतकऱ्याला सरकारकडून अनुदान किंवा कर्जमाफीच्या स्वरूपात खूपच काही दिले जाते, असा एक भारतीय जनमानसात गैरसमज पोसला गेला आहे. काय दिले जाते? असा जर उलट सवाल केला तर वारंवार रासायनिक खतावर भरमसाठ सबसिडी दिली जाते, याचाच उद्घोष जाणकारांकडून केला जातो. एवढ्या एका उदाहरणाच्यापुढे त्यांच्याही मेंदूला पंख फुटत नाहीत आणि बुद्धीही फारशी फडफड करीत नाही. ही रक्कम पन्नास हजार कोटीच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. पण ही रक्कम थेट शेतकऱ्यांना दिली जात नाही, खते उत्पादक कंपन्यांना दिली जाते. संधी मिळेल तेथे-तेथे पार मुळासकट खाऊन टाकणाऱ्यांच्या देशात पन्नास हजार कोटींपैकी बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर किती रक्कम हडप केली जाते आणि शेतीतल्या मातीपर्यंत किती रक्कम पोचते, हा एक संशोधनाचा विषय ठरावा. या देशातल्या रासायनीक खते उत्पादन करणाऱ्या कंपन्या आणि कंपन्यांना अनुदान वाटप करणारी प्रशासकीय यंत्रणा अत्यंत सज्जन, शीलवान व चारित्र्यवान आहेत. तेथे आर्थिक भ्रष्टाचाराला अजिबात थारा नाही, असे जरी गृहीत धरले तरी रक्कमही शेतकऱ्यासाठी दरडोई शे-पाचशे पेक्षा अधिक दिसत नाही. शिवाय ही रक्कम म्हणजे निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याला काहीच काम न करता निलंबन काळात फक्त रजिस्टरवर सही करण्यासाठी एक दिवसाच्या पगारावर शासकीय तिजोरीतून जेवढी रक्कम खर्च होते त्यापेक्षा कमीच आहे.

**बहुतांश बुद्धिजीवी, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, शासक आणि प्रशासक हे या गंगोत्रीचे लाभधारक असल्याने ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत असतात. यांचे चालणे, बोलणे, वागणे आणि लिहिणे प्रस्थापित व्यवस्थेला पूरक असेच असते. यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे असतात. त्यामुळे सत्य कधीच बाहेर येत नाही. याचा अर्थ एवढाच की शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ७० हजार करोड खर्च केल्याने देश बुडला नाही, अर्थव्यवस्था कोसळली नाही किंवा याच कारणामुळे महागाईही वाढली नाही. पण खरेखुरे वास्तव जाणिवपूर्वक दडवून ठेवले जाते.**

या प्रचलित अर्थव्यवस्थेचे खेळच न्यारे आहेत. रासायनिक खतांच्या सबसिडीच्या नावाखाली कंपन्या आणि संबंधित शासक-प्रशासकांचे उखळ पांढरे होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या नावाखाली बँकांची कधीच वसूली होऊ शकणार नव्हती अशी बुडीत निघालेली कर्जे वसूल होतात. शेतीविषयक वेगवेगळ्या अनुदानावर राजकारणी डल्ला मारून जातात. नाव शेतकऱ्यांचे आणि चंगळ करतात इतरच! शेतकऱ्याची ओंजळ रिकामीच्या रिकामीच राहते.

हे खरे आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळातही शेतकऱ्याला काहीच मिळत नव्हते; पण शेतकऱ्यांचे नाव घेऊन हजारो कोटी रुपये शासकीय तिजोरीतून उकळून त्यावर अवांतर बांडगुळे नक्कीच पोसली जात नव्हती. स्वातंत्र्य असो की पारतंत्र्य, राजेशाही असो की लोकशाही, व्यवस्था कोणतीही असो शेतकरी उपेक्षितच राहिला आहे. स्वातंत्र्य मिळूनही आणि लोकशाही शासनव्यवस्था येऊनही शेतकरी दुर्लक्षितच का राहिला, याची काही कारणे आहेत.

विधिमंडळ, न्यायपालिका, प्रशासन आणि प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चार प्रमुख आधारस्तंभ मानले जातात; पण शेतकऱ्यावाचून या चारही आधारस्तंभांचे काहीच अडत नाही. शेतकऱ्यांकडे अशी कोणतीच शक्ती वा अधिकार नाहीत की या चारही स्तंभांना शेतकऱ्यांची काही ना काही गरज पडावी आणि ज्यांची कुठेच, काहीच गरज पडत नाही, तो अडगळीत जाणार हे उघड आहे. नाही म्हणायला शेतकऱ्याकडे काही अस्त्रे आहेत, पण ती त्याला वापरण्याइतपत त्याच्यात पक्वता आलेली नाही.

विधिमंडळ : लोकशाहीमध्ये मतपेटीच्या माध्यमातून विधिमंडळ अस्तित्वात येते. तेथे मताचा योग्य तऱ्हेने वापर करणे गरजेचे असते; पण दुर्दैवाने आपल्या देशात उमेदवाराच्या योग्य-अयोग्यतेच्या आधारावर, विकासकामांच्या आधारावर, अर्थविषयक धोरणांच्या आधारावर, प्रश्न सोडविण्याच्या पात्रतेच्या आधारावर मतदान करायचे असते, ही भावनाच अजूनपर्यंत रुजलेली नाही किंवा तसा कोणी प्रयत्नही करत नाही. या देशातला किमान सत्तर-ऐंशी टक्के मतदार

तरी निव्वळ जातीपाती, धर्म-पंथाच्या आधारावरच मतदान करतो, ही वास्तविकता आहे. जेथे सुसंस्कृत-असंस्कृत, सुशिक्षित-अशिक्षित, सुजाण-अजाण झाडून सर्वच वर्गातील माणसे मतदान करताना धर्मासाठी कर्म विकतात आणि जातीसाठी माती खातात, तेथे शेतकरी आपला हक्क मिळविण्यासाठी मतदानाच्या अधिकाराचा शस्त्रासारखा वापर करतील, हे कदापी घडणे शक्य नाही. कारण समाज हा नेहमीच अनुकरणप्रिय असतो. एकमेकांचे अनुकरण करीतच वाटचाल करीत असतो. त्यामुळे शेतकरी जात-पात-धर्म-पंथ सोडून न्याय्य हक्क मिळविण्याच्या आधारावर योग्य त्या व्यक्तीला किंवा पक्षालाच मतदान करेल, अशी शक्यता निर्माण होण्याचीही शक्यता नाही आणि त्यामुळे शेतकरी वर्गाची मते गमावण्याच्या भितीने विधिमंडळ धोरणात्मक निर्णय घेताना शेतकरी हित प्रथमस्थानी ठेवतील, अशी दूरवरपर्यंत संभाव्यता दिसत नाही.

विधिमंडळात जायचे असेल तर निवडून यावे लागते आणि निवडून यायला प्रचंड प्रमाणावर पैसा लागतो, पक्षाचा आशीर्वाद लागतो. ज्याचा खर्च जास्त तो उमेदवार स्पर्धेत टिकतो. निवडणुका जिंकण्यासाठी वापरला जाणारा पैसा उमेदवाराने किंवा त्याच्या पक्षाने कुदळ-फावडे हातात घेऊन रोजगार हमीची कामे करून मिळवलेला नसतोच त्यामुळे सढळ हस्ते दान करणाऱ्या दानशुरांची सर्व उमेदवारांना व राजकीय पक्षांना गरज भासते. परिणामतः जिंकून येणाऱ्या उमेदवारावर आणि पक्षावर निधी पुरविणाऱ्यांचाच दरारा असतो. शेतकरी मात्र मुळातच कंगालपती असल्याने उमेदवारांना किंवा राजकीय पक्षांना आर्थिक दान देऊन त्यांच्यावर वचक ठेवण्याची संधी गमावून बसतो.

शेतकरी म्हणून शेतकरी या लोकशाहीच्या पहिल्या स्तंभाला काहीच देऊ शकत नसल्याने, त्याच्या पदरातही मग काहीच पडत नाही.

न्यायपालिका : स्वमर्जीने किंवा सत्य-असत्याच्या बळावर न्यायपालिका न्याय देऊ शकत नाही. विधिमंडळाने केलेले कायदे हाच न्यायपालिकेच्या न्यायदानाचा प्रमुख आधार असतो. संविधानातील परिशिष्ट नऊ हे शेतकऱ्यांचे मूलभूत हक्क पायदळी तुडविणारे कलम आहे, अशी न्यायपालिकेची खात्री झाली तरी काहीच उपयोग नाही. न्यायपालिका संविधानाशी बांधील असल्याने शेतकरी हीत जोपासण्यात हतबल आणि असमर्थ ठरत आहेत. शेतकऱ्यांना चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करू नये किंवा मुद्दलाच्या रकमेपेक्षा व्याजाची रक्कम अधिक असू नये, असा दामदुपटीविषयीचा आदेश असूनही, कोणत्याही बँकेने आजपर्यंत त्याची अंमलबजावणी केली नाही. तरीही असा आदेश पायदळी तुडविणाऱ्या बँकांना न्यायपालिका वठणीवर आणू शकल्या नाहीत.

शिवाय आता न्याय मिळविणे अतिमहागडे झाले असून न्याय मिळविण्यासाठी येणारा खर्च शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे.

प्रशासन : शेतकऱ्यांविषयी प्रशासनाची भूमिका काय असते याविषयी न बोललेलेच बरे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासन कुठेच दिसत नाही. शेतीच्या भल्यासाठी प्रशासन राबताना कधीच दिसत नाही. खालच्या स्तरावरून वरच्या स्तरापर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला भेटायला जायचे असेल तर खिशात पैसे टाकल्याशिवाय घरून निघताच येत नाही, अशी परिस्थिती आहे. ही मंडळी सर्व सरकारी योजना खाऊन टाकतात. आत्महत्याग्रस्त भागासाठी दिलेले पॅकेजही या मंडळींनी पार गिळंकृत करून टाकले.

अशा परिस्थितीत प्रशासनाकडून शेतीच्या समस्या सुटतील असा आशावाद बाळगणे म्हणजे उंदराच्या विकासासाठी मांजरीची नेमणूक करण्यासारखेच ठरते.

प्रसारमाध्यमे : शेतीच्या दुर्दशेला थोडीफार वाचा फोडण्याचे नित्यनेमाने प्रयत्न प्रसारमाध्यमांकडूनच होत असतात; पण प्रसारमाध्यमांच्याही काही मर्यादा आहेच. माध्यम चालवायला आर्थिकस्त्रोत लागतात. जाहिरात आणि अंक विक्री किंवा सबस्क्रिप्शन हे माध्यमांचे प्रमुख आर्थिकस्त्रोत बनलेले आहेत. जाहिराती देणाऱ्यांमध्ये खुद्द शासन, खाजगी कंपन्या, वेगवेगळ्या संस्था असतात. शेतकऱ्याला जाहिरात द्यायची गरजच नसते किंवा तसे आर्थिक पाठबळही नसते. अंक विकत घेण्यामध्ये किंवा पेड टीव्ही चॅनेल पाहण्यामध्येही शेतकरी फारफार मागे आहेत. स्वाभाविकपणे पेपर विकत घेऊन वाचणारा वृत्तपत्राचा वाचकवर्गही बिगरशेतकरीच असल्याने वृत्तपत्रातले शेतीचे स्थानही नगण्य होत जाते. मग कृषिप्रधान देशातल्या महत्त्वाच्या कृषिविषयक बातम्या आगपेटीच्या आकारात शेवटच्या पानावरील शेवटच्या रकान्यात आणि ऐश्वर्या रायच्या गर्भारशीपणाच्या बातम्या पहिल्या पानावर पहिल्या रकान्यात इस्टमनकलरमध्ये झळकायला लागतात.

शेवटी हा सारा पैशाचा खेळ आहे. शेतकऱ्यांकडे पैसा नाही म्हणून त्याची कोणी दखल घेत नाही. दखल घेत नाही म्हणून शेतीची दशा पालटत नाही आणि शेतीची दशा पालटत नाही म्हणून पुन्हा शेतीमध्ये पैसा येत नाही, असे दुष्टचक्र तयार होते आणि हे दुष्टचक्र एकदा तरी खंडीत करून शेतीमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची ऐपत लोकशाहीच्या या चारही आधारस्तंभात किंचितही उरलेली नाही, हे पचायला जड असले तरी निर्विवाद सत्य आहे.

त्यामुळे शेतीमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आता पाचव्या स्तंभाची नितांत आवश्यकता आहे, असे म्हणावे लागते.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४


■■

# मुक्तिपथ कहाँ है?

**[ हम आज मुक्ति की ओर अग्रगामी नहीं है बल्कि नये नये किस्म की गुलामियाँ की ओर अग्रसर है. हम गरिमामय जीवन की ओर नहीं बढ़ रहे बल्कि बंधे बंधाये रास्ते के दास बनाये जा चुके है. प्रतिभा का कोई भी फूल इस बासी आँगन में खिलने की संभावनाएँ हर उगते हुये दिन के साथ लुप्त होती जा रही है. समाज के सारे प्रतिभाशाली, उधमशील, कला संपन्न और नयी सोच के नायक आज अपने अपने जन्म के प्रमाणपत्रों के लिये किसी न किसी सरकारी कारकून के सामने लाईन में खड़े है. जन्म की दुर्घटना भविष्य को नियत्रिंत करने वाली सबसे मुख्य शक्ति बन चुकी है. ज्ञान पर भाषा हावी है, प्रतिभा पर जन्म हावी है. ]**

बाबा रामदेव को रामलीला मैदान से उठाते समय केंद्र सरकार ने कारण बताया था कि बाबा ने योगासन के लिये अनुमति ली थी, आंदोलन के लिये नहीं. ठीक उसी अंदाज में उत्तरप्रदेश की मुख्यमंत्री मायावती ने जमीन अधिकरण के विरूद्ध होने जा रहे भारतीय इतिहास के सबसे शौकीया राजनेता राजकुमार राहुल गांधी के आंदोलन को अनुमति देने से इंकार कर दिया है. कुछ इसी अंदाज में देश की बाकी सरकारें भी अपने यहाँ उनके विरूद्ध होने वाले आंदोलनों को कुचल रही है. समाज तंत्र को संचालित नहीं कर रहा है बल्कि तंत्र समाज की आवाज का गला घोंटने पर उतारु है.

यह वह तंत्र है, जिसके लिये ना जाने कितने शहीदों ने अपनी शहादतें दी थी; कितने महान बुद्धिमान नेताओं ने अपनी सारी उम्र दाँव पर लगा दी थी. जब यह देश विदेशी गुलामी के विरूद्ध संघर्षरत था तब आज के मुकाबिले कहीं ज्यादा आजाद था, क्योंकि तब हम सरकार से अनुमति लेकर आंदोलन नहीं करते थे. स्वंतत्रता समर के हमारे नेताओ ने सभी के मन में तंत्र के विरूद्ध तिरस्कार का भाव कूट कूट कर भर दिया था. असहयोग आंदोलन का मतलब ही यही था कि हम दूसरों की सत्ता को मानने से इंकार करते है. सारा देश एक जान, एक स्वर में अपनी वाणी को अभिव्यक्त करने के लिये सड़कों पर उतर चुका था. तब हम एक मनुष्य के रूप में गरिमा से जीने के अपने अधिकारों के लिये लड़ रहे थे. हम दूसरों का अपमान नहीं कर रहे थे, ना ही हम अपनी दुर्दशा के लिये किसी को जिम्मेदार ठहरा रहे थे, हम बस अपनी आजादी की माँग कर रहे थे. हम अपने कर्मो से बंधने को तैयार थे किंतु अपनी सुरक्षा और इज्जत को दूसरों की मर्जी का गुलाम बनाने को तैयार नहीं थे.



**ॲड. दिनेश शर्मा**

हिंदुस्थान दुनिया का एक ऐसा देश रहा है जिसने मोक्ष को जीवन का अतिंम ध्येय माना है, सदियों से आजादी जिसके व्यक्तित्व का सबसे निर्णायक तत्व रहा है. इसीलिये हमारा कोई एक भगवान, एक धर्मग्रंथ या जीवन की खोज का एक मार्ग कभी नहीं रहा. हमने अतीत को कभी भी भविष्य पर हावी होने नहीं दिया. हमने भविष्य को सदा मुक्त रखा कि वह अपनी व्याख्या स्वयं कर सके. इसीलिये हमारे पास इतिहास का वैसा लेखा जोखा कभी नहीं रहा जैसा पश्चिमी देशों के पास रहा है. यह कोई हमारी लापरवाही या कामचोरी नहीं थी बल्कि भविष्य को सदा सर्वदा के लिये मुक्त रखने का हमारा निर्णय था. नतीजा बेहद चमत्कारिक है. जितने ज्यादा परस्पर विरोधी विचार और धर्म हमारे यहाँ पनपे, उतने विश्व के किसी भी भूभाग में नहीं पनपे.

किंतु आजादी के बाद हम चूक गये. समाजवादी विचारों से प्रेरीत हमारे नेताओं ने एक ऐसा तंत्र देश पर थोप दिया जिसने समाज के प्रत्येक अंग को मानो अपने लौहपाश में जकड़ लिया है. आज जीवन का कोई ऐसा क्षेत्र नहीं बचा है जो इस तंत्र के शोषण से मुक्त हो. जीवन का मुक्त संगीत कहीं खो चुका है. हमारी भीतरी धारा मानो इस लंबे चले रेगिस्तान में कहीं दम तोड़ चुकी है. राजनीति, प्रशासन, व्यापार, शिक्षा, खेलकूद्ध और न्याय जैसे जीवन के प्रत्येक क्षेत्र पर सरकारी तंत्र इतने भद्दे तरीके से हावी हो चुका है कि

मानों अब नये जलप्रलय के पश्चात ही उससे मुक्ति मिलेगी.

इसके नतीजे इतने भयानक है कि कोई भी बुद्धिमान अर्थशास्त्री मिनटों में इसका लेखा जोखा दे सकता है. जितना नुकसान देश की प्रतिभा और चैतन्यता को आजादी के बाद के साठ सालों में पहुँचा, उतना मुगलों के तीन सौ और अंग्रेजों के डेढ़ सौ वर्षों के शासन में भी नहीं पहुँचा था. ब्रिटेन में जन्में प्रसिद्ध अर्थशास्त्री अंगुस मॅडीसन ने पिछले पाँच सौ वर्षो के वैश्विक अर्थव्यवस्था के आँकड़ो के आधार पर बताया था कि यूरोप के पुनर्जागरण काल से लेकर इसवी सन १५०० तक भारत दुनिया का सबसे धनवान देश था. और तो और अपने राजनैतिक इतिहास के सबसे हिंसक दौर से गुजरने के बावजूद उन्नसवी सदी की शुरूआत तक यह विश्व का दूसरा सबसे रईस देश था. मुगलों ने तो खैर इसे लूटा ही नहीं किंतु अंग्रेजो की सारी लूटपाट के बावजूद इस देश की प्रतिभा ने घुटने नहीं टेके थे. मॅडीसन ने आगे कहा कि आजादी के पश्चात पूंजी निर्माण के बजाये पूँजी का बँटवारा करने और सरकारी तंत्र के कब्जे ने भारतीय अर्थवय्वस्था को जर्जर बना कर रख दिया है. हमारा तंत्र दुनिया का सबसे खर्चीला, भष्ट्र और अनुत्पादक तंत्र है. यह पूंजी निर्माण की मूलभूत प्रेरणा को तबाह कर देता है.

आजादी के पहले देश में सभी जातियों में शैक्षणिक क्रांति का एक ज्वार उठा था जिसने देश के धनवान लोगों को शिक्षा में निवेश के लिये प्रेरीत किया. नतीजतन देश में बेहतरीन शिक्षकों, प्राचार्यो और शैक्षणिक साहित्य का जन्म हुआ. शिक्षकों का वेतन कम था क्योंकि पालकों के पास पैसे नहीं थे. किंतु देश के विद्यालय वास्तव में शिक्षा के मंदिर हुआ करते थे. शिक्षक भले ही गरीब थे किंतु समाज के सम्मानित तबके में गिने जाते थे. यह सारा कुछ व्यक्तिगत प्रयासों से हुआ. आज की स्थिति विदारक है. शासन नाम की यंत्रणा ने शिक्षा को बरबाद करने में कोई कसर ही नहीं छोड़ी है. जब वेतन नगण्य था तब ध्येय प्रेरीत लोग इस पेशे की शान हुआ करते थे. आज भरपूर पगार मिलने से जिनकी औकात नहीं ऐसे लोग भी शिक्षक बनने को तैयार बैठे है. अनुदान आधारित शिक्षा संस्थाओं ने नेताओ, शिक्षा अधिकारियों, शिक्षा संचालकों के ऐसे गिरोह पैदा कर दिये है जिन्होंने हमारी शिक्षा का बंटाधार कर दिया है. पाठ्यक्रम मंडलों की मनमानी के बारे में तो लिखना भी बेकार है. यदि इसके बाद भी कुछ तबाही शेष रह गयी थी तो वह दोपहर के भोजन की योजना ने पूरी कर दी है. आज मुख्याध्यापक और प्रभारी शिक्षक दिनरात बस एक ही चिंता में लगे रहते है कि कहीं बच्चों के खाने पीने में कोई दोष न रह जाये. खाने के भत्ते में घपले के आरोप प्रत्यारोप तो हर दिन समाचार पत्रों की सुर्खियाँ बनते रहते है. जो पुलिस दुर्दांत अपराधियों के पीछे लगना चाहिये, वह शिक्षकों से पूछताछ करती रहती है. वेतन में बढ़ौतरी, प्रमोशन, अनुशासन की कार्यवाही से संबंधित मुकदमें न्यायालय में चलते रहते है. समाज का पैसा नष्ट हो रहा है, समाज दूषित से ज्यादा दूषित हो रहा है किंतु तंत्र प्रसन्न है कि उसकी सत्ता चारों ओर विद्यमान है.

आजादी के पहले देश में ऐसा कोई गाँव या मुहल्ला नहीं था कि जहाँ अखाड़े ना हो. हमारे सारे खाली मैदान सुबह शाम बच्चों से भरे रहते थे. खेल कूद हमारी मजबूती का माध्यम थे. हम स्कूल छूटने का इंतजार करते थे. खेल हमारी जिंदगी का एक ऐसा हिस्सा था जो हमें सामुदायिक बनाता था. लड़कों और लड़कियों के खेल अलग अलग थे किंतु उनका रोल निश्चित था, हमारा सामुदायिक विकास; सारी छतें, सारी सडकें या गलियाँ हमारे मैदान हुआ करती. तब हम दर्शक के रोल में नहीं होते बल्कि खेल का हिस्सा हुआ करते. आजादी के पश्चात देश का खेल मंत्रालय और सारे नेता मिलकर देश में खेलों का विकास कर रहे है; हर नेता किसी न किसी खेल संघ का अध्यक्ष बना बैठा है. नतीजे में एक सौ बीस करोड़ की आबादी वाला यह देश ओलंपिक में एक पदक को तरस जाता है. अब खेलकूद, विशाल आयोजनों में बदल चुके है और हम केवल विज्ञापन देखने वाले दर्शक मात्र है. खेल हमे सामुदायिक नहीं बना रहा बल्कि हमारी सामुदायिकता को ही समाप्त कर चुका है. आज वह हमारी रगों में नहीं धड़कता बल्कि हमारे जेब की ताकत को कम कर रहा है.

राजनीति में नियम कानून, आरक्षण और तंत्र का इतना आतंककारी हस्तक्षेप विश्व के शायद ही किसी भू भाग में होगा जितना हमारे यहाँ है. आजादी के पूर्व राजनीति का क्षेत्र मुक्त था जिसमें कोई भी व्यक्ति हिस्सा ले सकता था. नतीजतन हर जाति ने अपने सर्वोत्तम नेता उसी दौर में देश को दिये थे. ये वे लोग थे जिनकी एक आवाज पर सारा मुहल्ला या शहर जमा हो सकता था. आज हम नये नये आरक्षण थोप कर और नये नये कानून बना बनाकर इस क्षेत्र को सिर्फ अयोग्य या निम्न स्तर के चालाक लोगों के लिये ही मानो आरक्षित कर चुके है. कहीं पर दो बच्चों से ज्यादा वाले चुनाव नहीं लड़ सकते तो कहीं पर जिनके घर में संडास नहीं है ऐसे लोग राजनीति में प्रवेश के लिये अयोग्य माने जा चुके है. जो लोग अपने घर के टैक्स नहीं अदा कर सकते वे भी चुनाव मैदान से बाहर किये जा चुके है. जितने ज्यादा कानून उतना तंत्र का कब्जा ज्यादा होता है. यदि देश के भावी नेताओं का फैसला ऐसे छोटे आधारों पर किया जायेगा तो इस देश को केवल भगवान ही बचा सकेगा. समाज में किसी मुद्दे पर जागरूकता लाना अलग बात है किंतु ऐसी बातों के लिये किसी को जन्म भर के लिये अयोग्य घोषित करने से समाज का ही नुकसान होता है. तीन बच्चों बाला सयुंक्त राष्ट्र संघ का महासचिव बन सकता है पर देश के सबसे छोटे से गाँव की नगरपरिषद का सदस्य नहीं बन सकता है, इससे बढ़ा मजाक और क्या हो सकता है. राजनीति आज समावेशक नहीं है बल्कि नये नये तरीकों से समाज को बाँट रही है. हर चुनाव क्षेत्र मानो ईश्वर चिट्ठी के भरोसे छोड़ा जा चुका है. ड्रा निकाल कर सीटों का आरक्षण किया जा रहा है. नतीजतन ज्यादातर सीटों पर काबिल उम्मीदवार मिलना मुश्किल हो चुका है. नेता विकास कामों से ज्यादा ठेके लेने में दिलचस्पी रखते है क्योंकि उन्हें मालूम है कि अगली बार उनकी सीट पर कोई अन्य लड़ेगा. हम योग्य लोगों की तलाश के बजाये अयोग्य लोगों की तलाश पर पूरा ध्यान दे रहे है. नतीजतन बेहतरीन नेताओं की प्रजाति ही मानों लुप्त होने के कगार पर हैं. राजनीति पूरी तरह अस्थिर की जा चुकी है और प्रशासन को स्थायी रूप से स्थिर किया जा चुका है. आज सामाजिक न्याय के नाम पर और समाज सुधार के अनगिनत कानून बनाने वाले ये सभी नेता कल इस बात के लिये अपना सर फोड़ेगें कि कैसे इन्होंने अपनी नकेल तहसीलदारों और जिल्हाधिकारियों के हाथों में देकर अपने ही पैरों पर



कुल्हाड़ी मारी थी.

प्रशासन को पारदर्शक और नैतिक बनाने के नाम पर हमने जितने कानून कायदे और नियम बनाये है, उन सभी ने मिलकर प्रशासन की मौलिकता ही समाप्त कर दी है. यदि हर बात एक बंधे बधाये ढाँचे में हो होने वाली है तो फिर हमें आदमियों की नहीं मशीनों या रोबोट की जरूरत रहेगी. समाज के दुर्बल घटकों, विकलांगों, महिलाओं, विस्थापितों, शहीदों की विधवाओं, अनुकंपा के पात्र दावेदारों के लिये आरक्षित सारे पद भरने की जद्दोजहद, अपने आप में एक महान कसरत हैं. फिर नियुक्ति हो जाने के बाद स्थानांतरण, प्रमोशन, डिमोशन, विभागिय कार्यवाही और निलंबन की इस पूरी कसरत में प्रशासन का कारोबार चलता रहता है. जिनके लिये यह सारा प्रशासनिक अमला काम करने का नाटक करता है, उस जनता के हिस्से में सिर्फ अपमान और शोषण ही आते है. किंतु जातियों और भाषाओं के युद्ध में आपस में भिड़े हुये समाज की आँखों पर पट्टी बंधी हुयी है. हर जाति येन केन प्रकारेण अपने ज्यादा से ज्यादा आदमी प्रशासन में घुसाने की तैयारी में है. हर जाति अपने अपने महात्मा की खोज में निकल चुकी है. इतिहास के भूले बिसरे पात्रों को ढूँढ ढूँढ कर उनके नाम पर संगठन खड़े किये जा रहे है और उन्हें महात्मा का दर्जा दिया जा रहा है. फिर अपने महात्मा का महत्व बढ़ाने के लिये दूसरों के महात्मा को शोषक ठहराया जाता है. तथाकथित शोषक और तथाकथित शोषितों की इस जंग में हम वर्तमान को जीने के बजाए अतीत को जी रहे है. वह भी हमारे अतीत को नहीं बल्कि हमारे पूर्वजों के अतीत को. जो देश अतीत की जंग से मुक्त होने को तैयार ही न हो, वह भविष्य की ओर किस निगाह से देखेगा, यह एक यक्ष प्रश्न है. ऐसा विभाजित प्रशासन, एक न्याय पर आधारित प्रतिभाशाली समाज की रचना कर ही नहीं सकता यह बताने के लिये हम और कितनी कीमत चुकाना चाहते है?

हम आज मुक्ति की ओर अग्रगामी नहीं है बल्कि नये नये किस्म की गुलामियों की ओर अग्रसर है. हम गरिमामय जीवन की ओर नहीं बढ़ रहे बल्कि बंधे बंधाये रास्ते के दास बनाये जा चुके है. प्रतिभा का कोई भी फूल इस बासी आँगन में खिलने की संभावनाएँ हर उगते हुये दिन के साथ लुप्त होती जा रही है. समाज के सारे प्रतिभाशाली, उद्यमशील, कला संपन्न और नयी सोच के नायक आज अपने अपने जन्म के प्रमाणपत्रों के लिये किसी न किसी सरकारी कारकून के सामने लाईन में खड़े है. जन्म की दुर्घटना भविष्य को नियत्रिंत करने वाली सबसे मुख्य शक्ति बन चुकी है. ज्ञान पर भाषा हावी है, प्रतिभा पर जन्म हावी है.

मोक्ष की कामना से ओतप्रोत यह महान देश कितनी देर तक इस पागलपन को बर्दाश्त करेगा, बस अब यही देखना है. जिस देश को विदेशी आक्रांताओं की तलवारें नहीं तोड़ सकी, उसे अपनों की कलम की स्याही कितने दिन तक बांध कर रखेगी. जिसने कभी आजादी की अपनी कामना के लिये ईश्वर के अस्तित्व के ठुकरा दिया था, जहाँ फकीरों के आँगन सदा कुबेरों से ज्यादा सम्मानित रहे है, जहाँ भाषायें हथियार नहीं पुल बनाने के काम आती रही, जहाँ ऋषी का कूल और नदी का मूल जानने की कोई कोशीश नहीं की गयी, उस देश को उसका जख्मी अतीत कब तक शासित करेगा, बस यही देखना है.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# गुलामगिरी

**खरे तर मूळच्या संविधानात शेतकऱ्यांच्या हातापायाला आर्थिक स्वातंत्र्यावर बंधन असलेले साखळदंड नव्हते. साखळदंडाची व्यवस्था ही महसूल खाते, नाफेड, भारतीय खाद्यान्न महामंडळ, नियोजन आयोग ही आहेत. या व्यवस्थेत (संरचनेत) एका अंदाजानुसार ७० लाख सरकारी निमसरकारी नोकरशहांची फौज कामाला जुंपली आहे. शेतकी समाजाचे आर्थिक स्वातंत्र्य काढल्यामुळेच ही संरचना (व्यवस्था) उभी झाली. संविधानाचे कलम ३१, १९ (ई) (एफ) ही आर्थिक स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क देणारी तरतूद आहे. हे हक्क काढून घेणारे कायदे हे संविधानाचे नवीन परिशिष्ट-९ मध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे न्यायालयाला ते रद्द करता येत नाही.**

## ॲड. सुभाष खंडागळे

माणसाच्या एका पायाला साखळदंड बांधला. दुसऱ्या पायाला तसाच साखळदंड बांधला तसेच त्याच्या एका हाताला एक साखळदंड बांधला. तसाच दुसऱ्या हाताला एक साखळदंड बांधला. असा माणूस तुमच्यासमोर उभा केला तर त्या माणसाला गुलाम म्हणतात. त्याच्या आणि जनावराच्या जीवनात काहीच फरक नाही. अमेरिकेत, युरोपात अशी गुलामगिरीची पध्दत होती. त्याकाळी अफ्रिका वैगेरे अशा भागांतून स्त्री-पुरुष यांना पकडून गुलाम म्हणून ठेवत होते. त्यांच्याकडून काम करून घेत होते. आज जनावरांकडूनसुध्दा काम करून घेतले जाते. अशा गुलामगिरीविषयी आजच्या काळात कोणत्याही माणसाला चीड येते.

काळ बदलला तसे गुलामगिरीचे स्वरूप बदलले. आताची गुलामगिरी ही आर्थिक स्वरूपाची आहे. शेती, उद्योग, व्यापार, संशोधन, तंत्रज्ञान ही आर्थिक स्वरूपाचे विविध अंग आहेत. १८ जून १९५१ रोजी आर्थिक गुलामगिरीचा निर्णय घेण्यात आला. शेतकरी एका भाकरीचे १०० भाकरी तयार करतो. म्हणून त्याला संसदेच्या दरबारात उभे केले. त्याच्या एका पायाला एक साखळदंड बांधला. दुसऱ्या पायाला एक साखळदंड बांधला. हा प्रकार झाला मालमत्तेचा मूलभूत हक्क काढून घेण्याचा साखळदंड. हा कड्याकड्याने बनतो ही झाली सरकारी नोकरांची फौज. ज्याच्या हातात साखळदंड आहे, ते आहेत सत्तेमधील राजकीय नेते. साखळदंड बांधण्यासाठी कायद्याचा हुकूम लागतो त्यासाठी भूअर्जन कायदा, सिलींग कायदा आणि इतर जमिनींविषयक त्या त्या राज्यांनी बनविलेले अडीचशेपेक्षा जास्त कायदे. मालमत्तेच्या मूलभूत हक्काची भारतीय शेतकऱ्यांची अशी ऐसी तैसी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या पायात मालमत्तेचे मूलभूत अधिकार काढून घेणारा साखळदंड टाकल्यामुळे राजकीय नेते आणि सरकारी नोकरांची फौज यांनी देशभर भूखंड घोटाळे केले. आजपर्यंत करोडो रुपये खाऊन टाकले. (घटनेचे कलम ३१)

शेतकऱ्यांच्या डाव्या हाताला साखळदंड लावला. शेतीला ज्या ज्या कृषीनिविष्ठा (उदा. खते, औषधी, बी-बियाणे, ट्रॅक्टर) इत्यादी लागतात. ते खुलेपणाने घेण्याचा मूलभूत हक्क हा साखळदंड शेतकऱ्यांच्या हाताला लावला. साखळदंडाच्या कड्या म्हणजे केंद्र व राज्य सरकारची कृषीखात्याची फौज. हा साखळदंड सत्तेतील राजकीय पुढाऱ्यांच्या हातात त्यामुळे दरवर्षी पेरणीच्या दिवसांत करोडे रुपयांचे खत घोटाळे, अवजार घोटाळे करून कृषीखात्याची नोकरशाही व राजकीय पुढारी खाऊन टाकतात. तसेच संशोधन, नवीन तंत्रज्ञान वापरण्याचा तथा स्वीकारण्याचा जे मूलभूत अधिकार आहे तो अधिकारही साखळदंड लावून काढून घेतले जातात. त्यामध्ये खत कारखानदारांचे प्रतिनिधी, शेती कशी करावी असे पोवाडे गाणारे व उपदेश करणारे मवाली जागो जाग गांडूळांसारखी वळवळ करतात. बरेच जण स्वयंसेवी संस्था उभारून सरकारकडून फंड लुटतात. वंदना शिवा ही त्यातलीच. यामध्ये खत कारखानदार व राजकीय सत्तेतील दलाल व सरकारी कृषी अधिकारी करोडे रुपये खाऊन टाकतात. महाराष्ट्राचे कृषीमंत्री विखे याबाबत फार चलाख आहेत. हा साखळदंड उद्योग, व्यवसाय करण्याचा मूलभूत अधिकार हा साखळदंड हाताला बांधल्यामुळे काढून घेण्यात आला.(कलम १९ (ई) (एफ))

शेतकऱ्याच्या उजव्या हाताला साखळदंड लावण्यात आला. शेतातून जो शेतमाल निघतो तो विकत घेण्यासाठी व्यापार करणाऱ्या कपन्या, व्यापार समूह यांना या साखळदंडाद्वारे बंधन घातले. तसेच



शेतमालावर प्रक्रिया करण्याचा अधिकार याद्वारे काढून घेण्यात आला. सडलेली, पिकलेली फळे, भाजीपाला, खराब झालेली ज्वारी, बाजरी, मका यांपासून वाईन तथा पेट्रोल बनविण्यास याद्वारे मनाई करण्यात आली. रेचे टाकून रूईच्या गाठणी बनविण्याचा अधिकारसुध्दा काढून घेण्यात आला. अशारीतीने शेतकऱ्यांचा उजवा व डावा हात साखळदंडाने बांधून ग्रामीण औद्योगिकीकरण होऊ दिले नाही. उजव्या हाताला साखळदंड बांधल्यामुळे शेतमालाची साठवणूक करण्याचा हक्क, प्रक्रिया करण्याचे, तंत्रज्ञान स्वीकारण्याचे हक्क, शेतमालाचे वितरण (बाजारपेठ) करण्याचा हक्क हा या साखळदंडांद्वारे काढून घेण्यात आला.  या साखळदंडांची यंत्रणा ही नाफेड आहे. देशभरातील कृषी उत्पन्न बाजार समित्या मिळून नाफेड तयार झाली. हा साखळदंड नाफेडची नोकरशाही व राजकीय सत्तेतील दलाल मिळून बनली.  दरवर्षी करोडो रुपयांचा घोटाळा होतो. हा पैसा सरकारी नोकरशाही व राजकीय सत्तेतील दलाल खाऊन टाकतात.

खरे तर मूळच्या संविधानात शेतकऱ्यांच्या हातापायाला आर्थिक स्वातंत्र्यावर बंधन असलेले साखळदंड नव्हते. साखळदंडाची व्यवस्था ही महसूल खाते, नाफेड, भारतीय खाद्यान्न महामंडळ, नियोजन आयोग ही आहेत. या व्यवस्थेत (संरचनेत) एका अंदाजानुसार ७० लाख सरकारी निमसरकारी नोकरशहांची फौज कामाला जुंपली आहे.  शेतकी समाजाचे आर्थिक  स्वातंत्र्य काढल्यामुळेच ही संरचना (व्यवस्था) उभी झाली. संविधानाचे कलम ३१, १९ (ई) (एफ) ही आर्थिक स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क देणारी तरतूद आहे. हे हक्क काढून घेणारे कायदे हे संविधानाचे नवीन परिशिष्ट-९ मध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे न्यायालयाला ते रद्द करता येत नाही.

शेती शिवाय शेतीवर आधारित उद्योग व इतर औद्योगिक समाजाचे १८ जून १९५१ नंतर कसे चित्र होते मला भूक लागली तर मी अन्न खाईन. तहान लागली तर पाणी पेईन. झोप आली तर झोप घेईन. काम करावयाचे असेल तर काम करीन. या ज्या दैनंदिन क्रिया असतात त्या आपण सहज करतो; पण तसे नाही. उद्योग करताना ज्या क्रिया उद्योजक सहज करतो त्या तशा करू नका. या आम्हाला विचारून व परवानगी घेऊन करा एवढीच ती अट. ज्यांना ही अट आवडली नाही ते देश सोडून गेले. त्यांनी परदेशात उद्योगांचे साम्राज्य उभे केले. युरोप, अमेरिका यांची प्रगती झाली आहे त्यामध्ये अशा अनिवासी भारतीयांचा वाटा फार मोठा आहे. तरीही बऱ्याच उद्योग समूहांनी ही परवानगी घेण्याचा जाच सहन करून उद्योगाचे साम्राज्य उभे केले असे टाटा उद्योग समूहासारखे फारच कमी; परंतू परवानगी घेताना सत्ताधाऱ्यांची हांजी हांजी करून, आतून मलिदा देऊन, भरमसाट कर सवलती घेणारा उद्योग समूह तयार झाला. त्यातून भ्रष्टाचार फोफावला; पण जागतिकीकरणामुळे हा परवानगी घेण्याचा जाच कमी कमी होत आला आहे. हांजी हांजी करून भरमसाट करसवलती घेणारा उद्योग समूह जागतिकीकरणाच्या स्पर्धेमुळे नष्ट होत आला आहे; पण शेतीवर आधारित उद्योगांना परवानगीचा जाच मात्र तसाच कायम आहे. या परवानगी पद्धतीमुळे दरवर्षी करोडे रुपयांचा भ्रष्टाचार होत आहे. ही परवानगी म्हणजे दोरीची संरचना उभी केलेली आहे.  त्यामध्ये सरकारी नोकरशाहीचा भरणा आहे. ही दोरी बांधण्याचे काम राजकीय सत्ता करीत आहे आणि करोडो रुपयांचा मलीदा लूटत आहे. उद्योगधंदा करण्याचा हक्क संविधानाचे कलम १९ (ई) (फ) मध्ये दिला; पण परवानगी अटीची दोरी लावून

**पान ३१ पाहा**

# हरितक्रांती आख्यान

**रोजगार हमी योजनेचा सारा अखर्चित निधी खर्च म्हणून दाखवण्याची 'लक्ष अंगठे ठसा किमया' आपल्या साऱ्यांना प्राप्त झाली पाहिजे. ही इच्छा पूर्ण व्हावी कारण आजच्या क्षणापर्यंत एकाही खऱ्या शेतकऱ्याचे कोडवर्डधारी खाते त्या बँकेत नाही मात्र असंख्य नेते, लोकसेवक, व्यावसायिक, एनजीओ, उद्योजक यांची मात्र तिथे हरितक्रांती सिद्ध झालेली डिपाझीटरूपी जमीन तिथेच आहे. हे सगळे आम्हाला आज आठवण्याचे कारण म्हणजे आम्हीही वारीला जाणे केव्हाच बंद केलेय,**



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**खरा शेतकरी तो**
**जो शासनदारी जात नाही ।।**
**खरा शेतकरी तो**
**जो एकही योजना सोडत नाही ।।**

आज आम्ही एक नवा सुविचार आमच्या अशा वाचकांसाठी देत आहोत जे आषाढीच्या वारीला गेलेले नाहीत. ते का गेले नाहीत याबाबतचा आमचा अंदाज असा आहे, की त्यांना संपत आलेल्या ज्येष्ठ महिन्याच्या त्या विनाकारण दाटून येणाऱ्या ढगांमधून पाऊस पडेल अशी आशा होती आणि ही आशा फोल ठरल्याने दुबार पेरणीची वेळ नशिबात आली होती. हे सगळे काय आहे? हे आहे फल त्या भविष्यकल्पनेचे ज्या कल्पनेत एका चांगल्या व्यक्तीने संपूर्ण भविष्याची सुंदर कल्पना करून हरितक्रांती आणि रोजगार हमी योजना सुरू करून ठेवली होती. आपल्या नावातच वसंतऋतूचे चैतन्य असलेला हा व्यक्ती मुळात वनक्षेत्रातून नागरी भागात आला आणि त्याने पाहिले, की रूक्ष-निर्जीव बांधकामांच्या जंगलात निर्मिती आणि समृद्धीच्या हिरव्या रंगाला कोठेही स्थान नाही. तिकडे फोडणीला तेल नाही, तर इकडे तेल निथळणे थांबत नाही. हे सारे पाहून त्याने हरितक्रांतीचे स्वप्न पाहिले आणि हळूहळू नकळत खऱ्या शेतकऱ्यांनाही दर्जेदार बियाणे, उत्तम वाण यांची सोय होत गेली. ही मंडळी मग आपल्या रानातच त्या वाढणाऱ्या रोपांमध्ये पांडुरंगाला शोधत गेली आणि मनोभावे शेतीचे अभंग म्हणत बसली तर ज्यांना शेती नव्हती ती मंडळी रोजगार हमी योजनेवर जाऊ लागली. हे सगळे सविस्तर इतिहासरूपात आलेले आहेत. पुढे घडले काय, की महिनाभर शेतीत राबून पेरणी करण्याऐवजी झाली तेवढी हरितक्रांती पुरे झाली म्हणत बलदंड, दणकट अशा डुप्लीकेट शेतकऱ्यांनी या जमिनी बेभाव विकत घेतल्या, नसलेल्या पिकाचे असलेले उत्पादन दाखवून मार्केट कमिटीच्या आवक माल रकमेत शुल्क भरून हजारो क्विंटल आपले धान्य दाखवले आणि शेती उत्पन्न खूप झाले म्हणून अनधिकृत खाल्लेले पैसे अधिकृत करून स्वत:च्या मनाची, तनाची हरित क्रांती करून टाकली. हे सगळे गेल्या वीस वर्षांत अति उफाळले आणि हा भस्म्या रोग शासनदारी न जाणाऱ्या शेतकऱ्यांनाच खाऊन बसला. या पहिल्या खऱ्या शेतकऱ्यांना मग पुढे भूमीहिनांचे लाभ मिळावे म्हणून रोजगार हमीवर कल्पनेनेच पाठवण्यास येऊ लागले, त्यामुळे भारतातील रस्त्यारस्त्यांचे महामार्ग बनले, धरणाधरणातून पाणी ओसंडू लागले. शेतमजूर दुपारची न्याहरी म्हणून पिझ्झा आणि कटलेट विथ थम्सअप खाऊ लागले, आपल्या प्रगत शेतीचे प्रात्यक्षिक परकियांना दाखवावे म्हणून आवर्जून त्या प्रात्यक्षिकाच्या हिरव्या स्क्रीप्ट स्वीस बँकेत जाऊन ठेवू लागले. बघा, चांगला उद्देश असला, की कोणतीही योजना कसे साऱ्या राष्ट्राला बळकट बनवते. ज्या निसर्गप्रेमी राजाने चारही कृषी विद्यापीठांची निर्मिती केली त्याच्या नावाने एकही हरितपट्टा आज या दगडांच्या देशात ओळखला जात

नाही. हे सुदैव म्हणू नये तर काय म्हणावे?

आम्हाला हे सगळे आठवले, कारण आम्हीही त्या सुसंस्कृत जगण्याला कंटाळलो आहोत ज्यात देवावर श्रद्धा ठेवावी आणि शेतीवर निष्ठा ठेवावी असे मानले गेलेले आहे. काय गरज आहे त्या पांडुरंगाच्या भेटीला दरवर्षी जाण्याची. काहीही झाले तरी विठुराया आपल्या साऱ्यांना

**जगत राहा जगत राहा**
**तुझे शोषण भोगत राहा**

हाच आशीर्वाद देणार आहेत. आता खरा आशीर्वाद हवा आहे या इच्छेची पूर्ती होण्याची की,

**देवा काहीही कर**
**स्वीस बँकेत पोचव लवकर**
**पैसा माझा वाढो भरभर**
**आजवर केली फार मरमर**
**शिड्या समृद्धीच्या चढू दे सरसर**

ही इच्छा पूर्ण होण्यासाठी रोजगार हमी योजनेचा सारा अखर्चित निधी खर्च म्हणून दाखवण्याची 'लक्ष अंगठे ठसा किमया' आपल्या साऱ्यांना प्राप्त झाली पाहिजे. ही इच्छा पूर्ण व्हावी कारण आजच्या क्षणापर्यंत एकाही खऱ्या शेतकऱ्याचे कोडवर्डधारी खाते त्या बँकेत नाही मात्र असंख्य नेते, लोकसेवक, व्यावसायिक, एनजीओ, उद्योजक यांची मात्र तिथे हरितक्रांती सिद्ध झालेली डिपाझीटरूपी जमीन तिथेच आहे. हे सगळे आम्हाला आज आठवण्याचे कारण म्हणजे आम्हीही वारीला जाणे केव्हाच बंद केलेय, कारण आमचे तीर्थ विठ्ठल नसून आणि क्षेत्रही विठ्ठल नसून जे आहे ते हे आहे, की

**तीर्थ बॉटल, क्षेत्र बॉटल**
**रोज बॉटल, कोरी बॉटल**

ही बॉटल नशिबात येण्याचे कारण म्हणजे आता आम्हीसुद्धा झाल्या तेवढ्या ग्रामविकासावर बेहद्द खुश आहोत. या विकासामुळे प्रत्येकाच्या गावाच्या वेशीजवळच्या रस्त्यावरच्या टपरीत पांढरीचपटी आली आणि गुटख्याची माळ लावलेली पाहून आम्ही त्या आऊटगोईंग ऑफ मनीदेवतेच्या मंदिरात जाऊन नतमस्तक होतो, शहरातून घरी काही न्यावे म्हणून तिथून पैसे आणण्याआधीच इथे उधार-उसणवार करून ठेवतो आणि सर्वांत आधी हरितक्रांती सिद्ध झाल्याचे लक्षार्थाने मान्य करतानाच आपल्या व्यय करण्याच्या वृत्तीमुळे त्या लघुउद्योजकाच्या चपट्या उत्पादनांची खरेदी करून रोजगाराची हमी देऊन टाकतो. हे सगळे आमच्या देवभक्ती, देशशक्ती आणि चिंतामुक्ती या गुणांपायी घडते. या गुणांमुळेच पुढे काळा पैसा म्हणजेच काळी माती, हिरवी नोट म्हणजे हिरवी क्रांती, रोजगार म्हणजे फिरा दारोदार ही नवी विकासवाट सापडते आणि दुबार पेरणीला वेळ दरसाल दरवर्षी नशिबात येते आणि आपण सारे म्हणत बसतो:

**विका जमिनी, खुलेल विठ्ठल**
**एनए, प्लॉटींग, फुलेल विठ्ठल**
**ऊनही विठ्ठल, शिराळ विठ्ठल**
**पाऊस रुसतो, हसतो विठ्ठल**
**नको पेरणी, सुगीच विठ्ठल**
**तीर्थच बॉटल, अट्टल विठ्ठल**
**बनोत सारे, डुलते विठ्ठल**
**वाम दिशेला, वसतो विठ्ठल**
**नको रुक्मिणी, म्हणतो विठ्ठल**
**बारीसाठी, व्याकुळ विठ्ठल**
**कामदंग तो, आता विठ्ठल**
**विठ्ठल विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल ।।**

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■

---

**गुलामगिरी पान २९ वरून पुढे**

तो हक्क संकुचित करून टाकला. तसा कायदा बनविला तो कायदा परिशिष्ट ९ मध्ये टाकला.

जयप्रकाश नारायण यांचे सन १९७५ चे भ्रष्टाचार विरोधाचे आंदोलन दडपून टाकण्यासाठी देशावर आणीबाणी लावून जयप्रकाश नारायण यांसह सर्व विरोधी पक्षाच्या नेत्यांना जेलमध्ये डांबून टाकले. स्व. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना आणीबाणीच्या समथनार्थ जनतेसमोर त्या सांगत असत की, ही लढाई नागरिकांचे मूलभूत हक्क (संविधानाचा विभाग ३) विरुध्द राज्यसत्तेसाठी निर्देशक तत्त्व (विभाग- ४) मधील आहे. वास्तविक इंदिरा गांधी जनतेची दिशाभूल करण्यासाठी हा वाद उभा करीत होत्या. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर जी लढाई आहे ती नागरिकांचे आर्थिक स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क विरुद्ध परिशिष्ट- ९ यां मधील आहे. जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार आंदोलनामुळे सत्ताबदल झाला; पण परिशिष्ट-९ ची व्यवस्था काही बदलली नाही. त्यामुळे भ्रष्टाचार कमी झाला नाही. अण्णा हजारे तथा रामदेव बाबा यांचे भ्रष्टाचारविरोधी मीडियामार्फत सुरू केलेले अभियान हे नागरिकांचे आर्थिक स्वांतत्र्य विरुध्द परिशिष्ट-९ याभोवती दिसत नाही. लोकपाल विधेयकामुळे परिशिष्ट-९ ची संरचना व गूण यामध्ये काहीच फरक पडत नाही. फार तर साखळदंडाच्या कड्या चकाचक असाव्या की कशा असाव्या हाच काय तो लोकपाल विधेयकाचा उपयोग. अण्णा आणि रामदेव यांच्यामुळे कदाचित सत्ताबदल होईल, पण आर्थिक स्वातंत्र्याचे काय? हा प्रश्न शिल्लक राहतोच.

शेतकरी आंदोलनामुळे शेतकी समाज हा आर्थिक क्षेत्रात गुलाम आहे. याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. चळवळीचा उद्देश जाणीव निर्माण करून देणे हाच आहे.

**ॲड. सुभाष खंडागळे**
मो. ९८५००१४०३९
पुसद.

■■

# शेतकरी संघटनेच्या इशाऱ्यानंतर शेतीपंपाचा वीजपुरवठा सुरळीत

**माढा :** माढा तालुक्यातील लऊळ येथील शेतीपंपाची सर्व कनेक्शन्स वीज महावितरण कार्यालयाने वसुलीच्या कारणास्तव बंद केली होती. येथील शेतकऱ्यांनी त्यामुळे तात्काळ शेतकरी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष परमेश्वर तळेकर व माढा तालुकाध्यक्ष बालासाहेब जगताप यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी परमेश्वर तळेकर यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकून यावर नक्कीच उपाय करू असे सांगितले. त्यानुसार परमेश्वर तळेकर यांनी वीज महावितरण कार्यालयास संपर्क साधून वीज पुरवठा तातडीने सुरळीत करावा अन्यथा आपण शेतकऱ्यांना बरोबर घेऊन रास्तारोको आंदोलन करू, असा इशारा दिला. त्यावेळी महावितरण कंपनीने तळेकर यांच्या मागणीचा गंभीरतेने विचार करून तात्काळ वीजपुरवठा सुरळीत केला. यावेळी परमेश्वर तळेकर यांनी सांगितले, की संजिवनी योजनेच्या नावाखाली आपण ऐन पेरण्यांच्या वेळेस शेतकऱ्यांना अडचणीत आणत आहात, त्यामुळे शेतकऱ्यांची हातची पिकेही वाया जातील. तरी तूर्त त्यांची तोडलेली कनेक्शन्स जोडून द्यावीत. त्यानुसार महावितरण कंपनीनेही ही मागणी मान्य केली. यावेळी माढा तालुकाध्यक्ष बाळासाहेब जगताप, नामदेवराव भोसले, मोहन (नाना) टकले, कार्यकरी अध्यक्ष लऊळ, शाखाध्यक्ष मारुती नलावडे, उपाध्यक्ष सिद्धेश्वर घोगे, प्रभाकर नलावडे व बहुसंख्य शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते. शेतकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा करून शेतकरी संघटनेचे आभार मानले. करमाळा तालुक्यातही अशी वीजतोड चालू आहे ती थांबवावी अशी मागणी तळेकर यांनी केली.

---

## शेतकरी संघटक स्थिर निधी

| | |
|---|---|
| **श्री. बजरंग बांगर**<br>मु. पो. पिंपळगाव खडकी,<br>व्हा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. | **रु. ११००** |
| **श्री. मारोतीराव पोखरकर**<br>मु. पो. पिंपळगाव खडकी,<br>व्हा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. | **रु. ११००** |
| यापूर्वी जमा निधी | रु. ५९,००० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ६१,२०० |

सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार. स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**-कार्यकारी संपादक**

---

॥ श्री ॥

सप्रेम नमस्कार!

सौ. धनवंती व श्री. विनय हर्डीकर यांचा मुलगा

**चि. अनिरुद्ध**

आणि सौ. वर्षा व श्री. किशोर रणदिवे यांची मुलगी

**चि. सौ. कां. संयुक्ता**

**यांच्या विवाहानिमित्त**

*दिनांक. १२ जुलै २०११ रोजी स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठरवला आहे.*
*नवीन दांपत्यास आशीर्वाद आणि शुभेच्छा देण्यासाठी अवश्य या.*
*नक्की भेटूया!*

**सौ. पद्मा वाबळे । श्री. रामचंद्र वाबळे**
**सौ. धनवंती हर्डीकर । श्री. विनय हर्डीकर । कु. संयोगिता हर्डीकर**
**सौ. माधवी कुबेर । श्री. अनिल कुबेर**

कार्यक्रमाची वेळ व स्थळ :
मंगळवार दि. १२ जुलै २०११, संध्याकाळी ६.३० वाजल्यापासून
हर्षल हॉल, कर्वे रोड, कासट पेट्रोल पंपाजवळ, कोथरूड, पुणे ३८.
आहेर किंवा पुष्पगुच्छांची औपचारिकता कशाला?

**संपर्क : विनय हर्डीकर मो. ०९८९०१६६३२७**